|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : ३५ सोमवार दि. २ सप्टेंबर २०२४ ते रविवार दि. ८ सप्टेंबर २०२४ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com


ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## अपत्यहीन पतीचे डोकेच फिरले मुल नसल्याने पत्नीला ठार मारले

नागपूर/क्राईम रिपोर्टर

पती पत्नीच्या संसारवेलीवर एक तरी फुल उमलायला हवे तर संसाराचे नंदनवन खऱ्या अर्थाने फुलते. संसाराला भर येते. पण काही जोडपी अशीही असतात ज्यांना संतती सुख मिळत नाही, पण संतती नसली तरी संसारात फारसा फरक पडत नाही. उलट अशा स्थितीत पती पत्नीने एकमेकांना सांभाळून घ्यायचे असते. पण काही लोक मात्र टोकाचा विचार करतात आणि याबाबत पत्नीला दोषी धरतात. नागपूरमध्ये अशाच एका घटनेत लग्नाला २० वर्ष ...पान २ वर

## पती, पत्नी व मुलीचे मृतदेह घरात सडवले वाड्यातील भयंकर हत्याकांड कुणी घडवले?









वाडा/क्राईम रिपोर्टर

मुंबई आणि आसपासच्या औद्योगिक शहरांमध्ये जागेची असलेली टंचाई आणि घरांच्या आवाक्या बाहेर गेलेल्या किमती यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातून पोट भरण्यासाठी इथे येणाऱ्या माणूस तात्पुरती सोय म्हणून भाड्याच्या घरात रहातो. अशावेळी जो घरमालक असतो. त्याने आपल्या घरात भाडेकरू ठेवताना त्याची संपूर्ण माहिती घेणे आवश्यक असते. त्यासाठी पोलिसांनी वेरीफिकेशन बंधनकारक केले आहे. भाडेकरू ठेवताना पोलीस वेरीफिकेशनचा एक अर्ज भरून द्यावा लागतो. त्यात भाडेकर व त्याच्या कुटुंबातील सर्व सदस्यांची छायाचित्रासह माहिती असते. कारण भाडेकरुने काही गुन्हा केला आणि तो कुठेही पळून गेल्यास त्याला पकडता येऊ शकेल म्हणून त्याची माहिती पोलिसांकडे असणे आवश्यक असते. कारण यापूर्वी काही भाडेकरूंनी गंभीर गुन्हे करून खोली मालकाला न सांगता पळ काढलाय आणि मग अशा आरोपींना शोधताना पोलिसांच्या नाकी दम आलाय. त्यामुळे कुठल्याही घरमालकाने भाडेकरू किंवा आपल्या घरात नोकर ठेवताना त्याची संपूर्ण माहिती पोलिसांना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र असे असतानाही काही लोक गपचूप भाडोत्री ठेवतात. त्या भाडेकरूची कोणतीही माहिती त्यांच्याकडे नसते. अशावेळी त्या भाडेकरूने काही कांड केले तर त्याला शोधणे खूप कठीण जाते. कारण मुंबई, ठाणे, पालघर, नवी मुंबई, वसई, विरार हि शहरे झपाट्याने औद्योगिक दृष्ट्या विकसित होत आहेत. या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या कंपन्या झाल्या आहेत आणि या कंपन्यामध्ये युपी, बिहार, मध्यप्रदेश गुजरात, पश्चिम बंगाल राजस्थान या राज्यातून मोठ्या प्रमाणावर मजूर येतात. राहायला जागा नसल्याने काही मजूर काम करतात तिथेच रहातात. तर काही जवळपास भाड्याने जागा घेऊन रहातात. पण या लोकांना भाडेकरू म्हणून ठेवताना काही लोक त्यांची माहिती घेत नाहीत. केवळ नाव आणि भाडे एवढेच ठरते, अशावेळी भाडेकरूने काही गुन्हा केला आणि पळून गेला तर त्याला शोधणार कसा पालघर जिल्ह्यातील वाडा येथील नेहरोली गावातील एका घरात पती पत्नी आणि त्यांची मुलगी अशा तिघांचे मृतदेह सापडले आहेत. प्राथमिक तपासानंतर या हत्या असल्याच्या निष्काशापर्यंत पोलीस पोहचले आहेत. मात्र या घरात जे भाडेकरू कुटुंब होते ते गायब आहे. त्यामुळे हे हत्याकांड त्यांनीच घडवले असावे असा संशय आहे.

एकाच घरातील तिघा कुटुंबीयांचे कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने खळबळ माजली आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील नेहरोली गावात हा धक्कादायक प्रकार घडला आहे. आई व तिच्या मुलीचा बंद पेटीत, तर वडिलांचा मृतदेह बाथरूममध्ये आढळून आला. जवळपास १२ दिवसांपासून संपर्कात नसलेल्या या कुटुंबाचे अशा पद्धतीने मृतदेह आढळल्याने हे हत्याकांड असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे तेव्हापासूनच मयत कुटुंबाचे भाडेकरु कुटुंब गावी गेल्यामुळे संशय बळावला आहे. मूळचे गुजरात येथील असलेले राठोड कुटुंब नेहरोली गावात गेल्या २० वर्षापासून राहत होते. कुटुंबात मुकुंद बेचरदास राठोड (७५), कंचन मुकुंद राठोड (७२)...पान २ वर

## लंपट दिराने वहिनीला पटवले दोघांनी पतीला मार्गातून हटवले



जळगाव/क्राईम रिपोर्टर



पीआय पाटील

दारुडा पती हा पत्नीसाठी डोकेदुखी ठरलेला असतो. कारण तो तिच्या कुठल्याच गरजा पूर्ण करीत नसतो. अशावेळ पोटाची आणि शरीराची गरज भागवण्यासाठी तिचे वाकडे पाऊल पडते. नाशिक जिल्ह्याच्या न्याय डोंगरी येथे राहणारी वंदना हिच्या बाबतीत असेच घडले. तिचा पती दारुडा असल्याने तिची कोणतीच गरज भागात नव्हती. मात्र तिच्या याच मजबुरीचा गैर फायदा तिच्या चुलत दिराने घेतला. त्यानंतर दोघांचे अनैतिक संबंध सुरु झाले. मात्र या संबंधात तिला पती बाळूचा अडसर वाटू लागला. त्यामुळे बाळूला ठार मारण्याचा दोघांनी काटा रचला त्यासाठी वंदनाने पती बाळूला शिर्डीला नेले आणि तिकडेच दिराला बोलावून घेतले व रस्त्यातच दोघांनी बाळूचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

कन्नड येथील वंदना या तरुणीचे लग्न नाशिक जिल्ह्याच्या नांदगाव तालुक्यातील न्यायडोंगरी येथील बाळु सिताराम पवार याच्यासोबत सुमारे बारा वर्षापुर्वी झाले होते. लग्नाच्या वेळी वंदना अवघी अठरा वर्षाची म्हणजे एकदम तरुण होती. न्यायडोंगरी गावातील गवळी वाड्यात राहणारा बाळू हा देखील अवघा २०-२१ वर्षाचा नवतरुण होता. दोघांनी एकमेकांना पाहताच त्यांनी लग्न करण्यास होकार दिला. दोघांचे त्यावेळचे सळसळते तारुण्य विवाहबंधनात कैद झाले. सुरुवातीचा वैवाहीक काळदोघांसाठीझकास होता. मात्र काही वर्षानी बाळूला दारु पिण्याचे व्यसन लागले. कामावरुन घरी परत येण्यापुर्वी त्याचे पाय मधुशाळेच्या अर्थात दारुच्या दुकानाच्या दिशेने वळू लागले. मधुशाळेत शिस्तीत जाणाऱ्या बाळूची घरी येतांना शिस्त बिघडत असे. तो बेशिस्त अवस्थेत झोकांड्या देतच घरी परत येत होता. त्याच्या या वर्तनाला त्याची पत्नी वंदना पार वैतागून जात होती. कधी कधी मद्यधुंद अवस्थेतील बाळूला घरी सोडण्यासाठी त्याचा चुलत भाऊ गजानन राजेंद्र पवार हा येत होता. बाळूला त्याच्या घरी सोडण्यासाठी ...पान २ वर

## चोरांची लिफ्ट घेऊन विनाकारण फसला अल्पवयीन विनोद जीव गमावून बसला




भिवंडी/क्राईम रिपोर्टर

स्त्यात अनोळखी माणसांची मदत घेणे धोकादायक असते. कारण कार किंवा दुचाकीवरून लिफ्ट देणारे चोर लुटारू सुद्धा असू शकतात. भिवंडीत अशाच एका घटनेत मार्केटमध्ये जाण्यासाठी एका १३ वर्षाच्या मुलाने स्कूटरस्वाराची लिफ्ट घेतली, पण तो लुटारू निघाला आणि त्याने त्या मुलाचे अपहरण करून त्याच्या कडच्या मोबाईल आणि १०० रुपयांसाठी आपल्या साथीदारांच्या मदतीने त्या मुलाची हत्या या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

भिवंडी येथे अवघ्या १०० रुपये आणि मोबाईलसाठी विनोद पागे या १३ वर्षीय मुलाची अपहरण करून हत्या करण्यात ...पान २ वर

## असहाय्य विवाहितेची जराही नव्हती कीव सासरच्या माणसांनी घेतला रेश्माचा जीव

मुंबई/एस.कुमार

हुंड्यासाठी विवाहितेचा नेहमीच छळवाद केला जातो. मात्र काही ठिकाणी सोशिक महिलांना केवळ गुलामासारखे वागण्यासाठी त्यांचा सासरच्या लोकांकडून छळ केला जातो. अशावेळी त्या विवाहितेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवला किंवा प्रत्युतर केले तर तिचा जीव घ्यायलाही सासरची मंडळी मागेपुढे पाहत नाहीत. मुंबईतील ट्रॉम्बे येथे अशाच एका घटनेत रेश्मा जैस्वाल या विवाहितेचा सासरच्या लोकांकडून छळ सुरु होता. काही दिवस तिने सहन केले, पण तिची सहनशीलता संपल्यावर तिने प्रतिकार करताच पती, सासू नणंद, नंदोई आदींनी मिळून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



स्त्री ही काळोख्या रात्री सामसूम रस्त्यावर अनोळखी व्यक्तीसोबत एकदा सुरक्षित राहील परंतु घराच्या चार भिंतींमध्ये आपल्याच घरच्या मंडळींमधे ती सुरक्षित असेलच असे नाही.' वाढत्या घरगुती हिंसाचाराचे हे एक अत्यंत ज्वलंत उदाहरण आहे. कौटुंबिक हिंसाचाराचे दृश्य हे सर्वदूर पसरलेले आहे, पण लोकांच्या नजरेत भरुन येण्याइतके व्याप्त नाही. देशात कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५' निर्माण झाला.परंतु आजही देशात कौटुंबिक हिंसा ही घरात घडते आहे. ज्या घरालाआपण सर्वात सुरक्षित स्थळ समजतो. त्याच घरात चार भिंतीच्या आड आज ही स्त्रियांवर अत्याचार होत आहे.अशाच प्रकारची घटना मुंबईत घडली आहे. दिनांक २३ आगस्ट २०२४ चा दिवस होता. सकाळची वेळ होती. त्यादिवशी ट्रॉम्बे पोलीस ठाण्यातील अधिकारी आपापल्या ...पान २ वर

## कमिशन बुडवण्याचा प्रयत्न प्राणावर बेतला अखेर प्रॉपर्टी डीलर महिलेचा जीव घेतला

गोवा (मडगाव)/क्राईम रिपोर्टर



कोणताही व्यवहार पारदर्शक असावा लागतो. व्यवहारात केलेली लबाडी वादास कारणीभूत ठरते आणि त्यातून एखाद्या माणसाचा जीवही जातो. गोव्यातील कळगुट येथे राहणारी दिवोदिता फर्नाडीस ही प्रोपर्टी डीलर होती. मात्र तिचे व्यवहार चांगले नव्हते. या व्यवहारात तिने कमिशन एजंटना सतत झुलवत ठेवले, त्यांचे कमिशन देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे चिडलेल्या कमिशन एजाटांनी तिची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

६४ वर्षीय दिओदिता फर्नाडिस या खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत होत्या.या वयात त्या बेन्सन अर्पाटमेंट तिसऱ्या मजल्यावर एकटयाच राहत होत्या.तसे त्याच्याकडे व्यवसायाच्या निमित्याने अनेकांची ये जा होत होती. त्यामुळे त्याचा दिवस हा भरगच्च असा जात होता. त्या या वयात ही व्यस्त राहत असल्याने तंदरूस्त दिसत होत्या. त्याचा स्वभाव हा चिकट होता. त्यांच्या हातून सहसा पैसा सुटत नव्हता. त्याच्या या स्वभावाने त्याचे नातेवाईक ही त्याच्या पासून लांब राहत होते. त्याच्या बहिणीचा नवरा फक्त त्याच्या घरी कधी तरी येत जात होता. त्याला ही त्यांनी कधी आपला अंदाज दिला नव्हता. त्यामुळे त्याला ही त्याच्या व्यवहारातील फारसे काही ...पान २ वर

## हत्या केल्याची फुशारकी मारणे अंगाशी आले प्रेयसीच्या पतीला मारणारे खुनी गजाआड झाले



मयत उमेळ फाले

दोडामार्ग/क्राईम रिपोर्टर

काही लोक असे असतात कि त्यांना चुकीच्या कामाचीही फुशारकी मारण्याची सवय असते, पण गुन्हा करणाऱ्यांना हे ठावूक नसते कि भिंतीनाही कान असतात आणि भिंतीला असलेले हेच कान आपला घात करू शकतात. मणेरी धनगरवाडी येथील उमेश फाले याला दारूचे व्यसन होते. त्यामुळे त्याच्या बायकोने राजाराम नावाच्या इसमाशी अनैतिक संबंध जुळवले. राजारामचे आपल्या पत्नीशी अनैतिक संबंध असल्याचे उमेशला समजताच तो भयंकर चिडला आणि पत्नीला मारहाण करू लागला. त्यामुळे पत्नीने प्रियकर राजारामला सांगून पतीच्या हत्येचा कट रचला. त्यानंतर राजारामने आपल्या मित्रांच्या मदतीने उमेशला दारूच्या पार्टीला बोलावून त्याची हत्या केली, पण त्यातील एका आरोपीने दारूच्या नशेत उमेशचा खून केल्याची मित्रांजवळ फुशारकी मारली आणि हि बातमी पोलिसांना कळली. त्यानंतर पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

मणेरी धनगरवाडी येथे उमेश फाले हा आपल्या पत्नी मुलासह राहयला आहे. त्याच्या घरच्या बाजुला काजुची बाग असून त्या बागेत गावातीलच राजाराम गवस हा कामाला असल्याने त्याची व उमेश फाले याची चांगली ओळख निर्माण झाली. त्यातून राजाराम याचे उमेश याच्या घरी कायम येणे जाणे होऊ लागले. उमेश याच्या बायकोशी राजाराम याची घसट वाढली. नवऱ्याच मित्र म्हणून ती



त्याला भावोजी म्हणून बोलवू लागली. दोघे ही बोलताना एकमेंकाशी हसत खेळत ...पान ६ वर

## रक्ताचे नाते 'चांगदेव' याला नाही कळले जमिनीच्या वादात भावाला जिवंत जाळले

नाशिक/क्राईम रिपोर्टर



मयत कचेश्वर

ग्रामीण भागात शेतीचे वाद सामोपचाराने किंवा कधी कधी न्यायलयात सुद्धा सुटत नाहीत. मात्र अशा वादात माणूस रक्ताची नाती -गोतीही विसरून जातो. मुलगा बापाचा वैरी बनतो भाऊ भावाचा वैरी बनतो आणि या वादातून रक्ताच्या नात्यातही रक्ताचे पाट वाहतात. नाशिक जिल्ह्यातील थडी सारोळे गावात जमिनीच्या वादातून सख्ख्या भावाने आपल्या मुलांच्या मदतीने वृद्ध भावाचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

वडीलोपार्जित जमिन व मालमत्तेचा वाद आपल्या माणसांनाही वैरी बनवतो. मालमत्तेसाठी सख्खा भाऊ पक्का वैरी होतो. आपल्याच भावाला पाण्यात पहातो. काही वेळा तर भावाचा जीव घ्यायलाही भाऊ मागे-पुढे पहात नाही. त्याला माहित पण नसते की भावाला संपवून आपण तुरूंगात जाऊ, मालमत्ता मात्र तशीच पडून राहिल. त्यावरील कोणाचाच हक्क कोणी हिरावून घेणार नाही याची जाणीव नसल्याने लोक रक्ताच्या नात्यातही वैर वाढवून खुनासारखे गुन्हे करतात. नाशिक जिल्ह्यातील थडी सारोळे या गावात वडीलोपार्जित शेतातील विहीरीच्या वादातून सख्ख्या भावासह ...पान ६ वर

## शिष्यावर हात उचलणे महागात पडले अल्पवयीन मुलांकडून हत्याकांड घडले

सांगली/क्राईम रिपोर्टर



मयत अनिकेत

आजकालच्या मुलांना लहानपणापासूनच पालकांचा धाक नसल्याने मुले उर्मट आणि मुजोर बनतात. अशी मुले वडिलधार्याचे सोडाच पण आई-वडिलांचेही ऐकत नाहीत. सांगलीच्या जामवाडी भागात राहणार अनिकेत हा स्वतः एक उत्कृष्ट कबड्डी पटू होता. तसेच त्याने परिसरातील मुलांना कबड्डीचे प्रशिक्षण द्यायलाही सुरुवात केली होती. मात्र ज्या मुलांना तो प्रशिक्षण देत होता. त्यातला एक मुलगा आगाऊ होता तो अनिकेतला जुमानत नव्हता. त्यामुळे अनिकेतने त्याच्या कानाखाली मारली. या गोष्टीचा त्या अल्पवयीन मुलाला इतका राग आला कि त्याने अनिकेतच्या विरोधातील आणखी ४ मुलांना आणि एका व्यक्तीला सोबत घेऊन अनिकेतची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.



सांगली शहरातील जामवाडी परिसरात अनिकेत तुकाराम हिप्परकर हा आपल्या आजी, आत्या आणि भावासह राहयला आहे. तो सांगली शहरातील कॉर्नरच्या एका महाविद्यालयात शिक्षण घेत असून तो एक चांगला कबड्डी पटू ही आहे. त्याच्या वडिलांचे गेल्या काही वर्षापूर्वी निधन ...पान ६ वर

पान १ वरून...

## अपत्यहीन पतीचे डोकेच फिरले...

झाली तरी मुल होत नसल्याने एका इसमाने त्याच्या पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. २० वर्षे संसार केल्यानंतरही पत्नीला मुलबाळ झाले नाही, त्यामुळे नैराश्यात गेलेल्या पतीने पत्नीचा दंड्याने डोके फोडून खून केला. दार बंद करून तिचा मृतदेह घरात झाकून ठेवला. माणुसकीला काळीमा फासणारी गंभीर घटना कळमना पोलीस ठाण्याअंतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी पतीला अटक केली. बाबुलाल वर्मा (४३) रा. विजयनगर, कळमना असे आरोपीचे नाव आहे. बाबुलाल आणि पत्नी सबीरा वर्मा (४०) हे मूळचे छत्तीसगढ राज्यातील आहेत. काही वर्षांपूर्वी कामाच्या शोधात नागपुरात आले आणि इथेच स्थायिक झाले. बाबुलालच्या लग्नाला जवळपास २० वर्ष झालीत. मात्र, त्याला मुल नव्हते. याच कारणावरून तो पत्नीशी नेहमी भांडण करायचा. अलिकडे त्याचा अपघात झाल्याने तो दारु प्यायला लागला होता. मंगळवारी तो कामावर गेला नव्हता. दुपारच्या सुमारास त्याने अपत्य होत नसल्याच्या कारणावरून पत्नीशी भांडण केले. वाद विकोपाला जाताच त्याने दांड्याने तिच्या डोक्यावर प्रहार केला. ती रक्तबंबाळ स्थितीत खाली कोसळली. काही वेळातच तिचा मृत्यू झाला. तिचा मृत्यू झाल्याचे बाबुलालच्या लक्षात आले. त्याने आतून दार बंद केले व तिच्या मृतदेहाजवळ सहा तास बसून होता. थानसिंग वर्मा (२४) हा आरोपीचा भाचा असून तो जवळच राहतो. त्याने मामाला फोन करून आत्याला फोन देण्यास सांगितले. तुझ्या आत्याचा मी आत्ताच खून केला', असे त्याने सांगितले. यावर भाचा म्हणाला, मामा गंमत करु नका. मला आत्याशी महत्वाचे काम आहे.'यावर खरंच तुझ्या आत्याची हत्या केली.' असे सांगितल्याने भाच्याच्या पायाखालची वाळू सरकली. त्याने तडक आत्याचे घर गाठले. थानसिंग वर्मा हा धावपळ करीत रात्री ९ वाजताच्या सुमारास आत्याच्या घरी पोहोचला. मात्र, दार आतून बंद होते. दार ठोठावले, परंतु आतून काहीच प्रतिसाद मिळत नव्हता. त्याने खिडकीतून पाहिले असता घरात रक्ताचा सडा दिसला. ही बाब त्याने पोलिसांसह वस्तीतील लोकांना सांगितली. बाबुलालच्या घरासमोर लोकांची गर्दी जमली. माहिती मिळताच ठाणेदार प्रशांत पांडे सहकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. तेव्हा बाबुलालने दार उघडले. आत मधील दृश्य पाहून पोलीसही हादरले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. बाबुलालला पोलिसांनी अटक केली.

## पती, पत्नी व मुलीचे मृतदेह घरात...

आणि मुलगी संगीता मुकुंद राठोड (५२) यांचा समावेश होता. १८ ऑगस्टपासून हे कुटुंब संपर्कात नसल्याने राजकोट येथे फॅब्रिकेशन व्यवसाय करणारा त्यांचा मुलगा सुहास शोध घेण्यासाठी नेहरोली येथे आला. मात्र घराला बाहेरून कुलूप असल्याने कुटुंब आजारी तर नाही ना या चिंतेने सुहास यांनी आजूबाजूचे सर्व दवाखाने तपासले. कुटुंबाचा कुठेही शोध लागत नसल्याने अखेर घरातील काही कागदपत्रे काढण्याच्या उद्देशाने त्यांनी कुलूप फोडले, तेव्हा घरातील दृश्य बघून त्यांचा थरकाप उडाला. आई व मुलीचा मृतदेह एका बंद पेटीमध्ये आढळून आला, तर वडिलांचा मृतदेह बाथरूममध्ये पडलेला त्यांना दिसला. अनेक दिवसांपासून मृतदेह या ठिकाणी पडल्याने ते कुजलेल्या अवस्थेत होते. मृतदेहांची दुर्गंधी बाहेर येऊ नये या उद्देशाने बहुदा मृतदेहांवर जाड गाद्या टाकण्यात आल्या होत्या. या घटनेची माहिती त्वरित वाडा पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सध्या वाडा पोलिस या घटनेचा तपास करीत असून हे हत्याकांड असल्याचा संशय सुहास यांनी व्यक्त केला आहे. राठोड कुटुंब ज्या दिवसापासून संपर्कात नव्हते, तेव्हापासूनच मुकुंद यांचे भाडेकरू कुटुंब गावी गेल्याचे सुहास यांनी सांगितले. या भाडेकरु कुटुंबाची चौकशी केल्यानंतर काही धागेदोरे बाहेर येण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे व इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी अधिक तपास करत आहेत.

## लंपट दिराने वहिनीला पटवले...

आलेला गजानन आणि वंदनाची नजरानजर होत असे. मद्यधुंद अवस्थेतील बाळू घरी येताच बडबड करत गाढ झोपून जात असे. तुमच्या भावाच्या दारुच्या व्यसनामुळे मला जीवन नकोसे झाले आहे असे वंदना एकदा तिचा चुलत दिर गजानन पवार यास म्हणाली. त्यावेळी गजाननेमी तुझ्या पाठीशी आहे असे म्हणत धीर दिला. बाळू मद्याच्या आहारी गेला म्हणजे तिचा दिर गजानन हा तिच्या भेटीला येत असे. त्यातून दोघांचा सहवास वाढत गेला. सहवासातून दोघांमधे प्रेमाची कळी खुलण्यास सुरुवात झाली.त्यानंतर दोघांचे प्रेम बहरण्यास सुरुवात झाली. अशा प्रकारे बाळूचे मद्यपान वंदना आणि गजाननच्या प्रेमाची दारे उघडण्यास कारणीभूत ठरली. वंदना आणि गजानन यांच्यातील प्रेमाची खोली एवढी वाढली की त्यांना बाळूची अडचण होऊ लागली. बाळू आपल्या प्रेमात अडथळा होत असल्याची तक्रार वंदनाने तिचा दिर गजाननकडे केली. तिला आता पती बाळूपेक्षा दिर गजानन जवळचा वाटत होता. मद्याच्या नशेत बाळूचे बोलणे वंदनाला असह्य होत असे. त्यामुळे त्याला या जगातून कायमचे संपवले तर आपण गजाननसोबत मौजमजेत राहू शकतो असे वंदनाला वाटू लागले. तिने आपल्या मनातील विचार गजाननकडे बोलून दाखवला. गजानन याने तिच्या विचाराला होकार देत सहमती दर्शवली. दोघांनी मिळून बाळूला या जगातून कायमचे बाद करण्याचे ठरवले. त्या दृष्टीने दोघांनी कट आखण्यास सुरुवात केली. साधारण चार ते पाच महिन्यापुर्वी दोघांनी बाळूला संपवण्याचा कट आखला. त्या पुर्व नियोजीत कटानुसार वंदना आणि बाळू हे पती पत्नी शिर्डी येथे गेले. दि. १८ जून २०२४ रोजी शिर्डी येथून चाळीसगावला येणार असल्याची माहिती तिने गजाननला दिली. चाळीसगाव रेल्वे स्टेशनला आल्यानंतर तिने फोन करुन गजाननला बोलावून घेतले. ठरल्यानुसार गजानन मोटार सायकल घेऊन दोघांना घेण्यासाठी आला. सर्वकाही वंदना आणि गजानन यांच्या कटानुसार सुरु होते. गजाननने दोघांना आपल्या मोटार सायकलवर बसवून घेत भडगाव रस्त्यावरील हसत खेळत या हॉटेलवर आणले. या ठिकाणी गजाननने बाळूला मोठ्या प्रमाणात दारु पाजली. गजाननकडून फुकटची दारु पिण्यास मिळत असल्याचे बघून मद्याचा शौकीन असलेल्या बाळूने पिण्याचा सपाटा सुरु केला. नेमके हेच गजानन आणि वंदना या दोघांना हवे होते. दोघांच्या पुर्वनियोजीत कटानुसार सर्व घटनाक्रम सुरु होता. बाळूने यथेच्छ दारु पिल्यानंतर तिघांनी जेवण केले. या सर्व घटनाक्रमात रात्रीचा अंधार पडण्यास सुरुवात झाली. रात्रीच्या अंधाराचा गैर फायदा घेत वंदनाने ठरल्यानुसार आता मला माझ्या माहेरी कन्नडला जायचे आहे असा हेका मुद्दाम सुरु केला. बाळूने मोठ्या प्रमाणात मद्यपान केले असल्यामुळे त्याला काहीही सुचत नव्हते. मात्र कन्नडला जाण्याच्या बहाण्याने त्याला रस्त्यावर नेऊन ठार करण्याचे दोघांचे नियोजन होते. कन्नडला जाण्याच्या बहाण्याने तिघे ट्रिपलसिट मोटारसायकलने निघाले. गजानन राजेंद्र पवार याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल हिरापूर रोडने खडकी बायपास व तेथून कन्नड रोडने कोदगाव शिवारात नेली. याठिकाणी तिघेजण रस्त्याच्या खाली उतरले. वंदनाचा पती बाळूने बेतापेक्षा अधिक मद्यप्राशन केल्यामुळे त्याला काहीही सुचत नव्हते. आता बाळूचे मरण जवळ आले होते. आपली मृत्यूची घटीका समीप आल्याचे मद्याच्या नशेतील बाळूला काय समजणार होते. ठरलेल्या कटानुसार वंदनाने तिच्या जवळ असलेल्या सॅकमधून जुने ब्लेड बाहेर काढले. त्या ब्लेडचे पाते तिने पती बाळूच्या पोटावर मारले. ब्लेडच्या धारदार पात्याचे वार बाळूच्या पोटावर होताच बाळू तळमळत खाली कोसळला. बाळू जमीनीवर तळमळत असतांना जवळच पडलेला एक सुमारे २५ ते ३० किलो वजनाचा दगड गजानन याने उचलला. तो वजनदार दगड उचलून गजाननने बाळूच्या चेहऱ्यावर आपटला. आधी ब्लेडचे पोटावर वार नंतर दगडाचे चेहऱ्यावर घाव बसल्याने बाळू अजूनच मोठमोठ्याने तळमळू लागला. गंभीर जखमी झालेल्या बाळूने निर्मनुष्य रस्त्याच्या कडेला रक्ताच्या थारोळ्यात आपले प्राण सोडले. अशा प्रकारे मद्यपी बाळूचा करुण अंत झाला. बाळू पवार हा काहीही हालचाल करत नसल्याचे बघून आपले काम फत्ते झाल्याचे समाधान दोघांच्या चेह-यावर उमटले. आता आपल्यावर कुणीही संशय घेऊ नये यासाठी त्याच्या अपघाती मृत्यूचा देखावा करण्यास दोघांनी सुरुवात केली. बाळू पवार याचा मद्याच्या नशेत अपघात झाला आहे असे दाखवण्यासाठी दोघांनी त्याचा मृतदेह ओढत ओढत महामार्गावर आणून टाकला. त्याची ओळख पटावी म्हणून वंदनाने आठवणीने आणलेले त्याचे आधार कार्ड तिच्या ताब्यातील सॅकमधून बाहेर काढले. ते आधार कार्ड त्याची ओळख पटण्यासाठी त्याच्या शर्टाच्या खिशात न चुकता ठेवण्यात आले. त्यानंतर गजानन याने मोटार सायकलने वंदनाला चाळीसगाव रेल्वे स्टेशनला सोडून तो एकटाच न्यायडोंगरी येथे निघून आला. आता आपल्यावर कुणीही शंका घेणार नाही अशा अविर्भावात दोघे एकटेच आपल्या आपल्या घरी वेगवेगळ्या साधनांनी व मार्गाने जाण्यास निघाले. रात्रभर बाळूचा मृतदेह तसाच अंधारात पडून राहिला. दुसऱ्या दिवशी १९ जून २०२४ रोजी बाळूचा मृतदेह गावकऱ्यांच्या नजरेस पडला. हा अपघाती मृत्यू असल्याचा समज लोकांचा झाला. या घटनेप्रकरणी तुषार अनिल देसले या कोदगाव येथील सुज्ञ नागरिकाने चाळीसगाव शहर पोलिस स्टेशनला बाळू सिताराम पवार यास कोणत्यातरी वाहनाने धडक दिल्याने त्याचा अपघाती मृत्यू झाला असावा अशी खबर दिली. त्याच्या खिशातील आधार कार्डामुळे त्याची ओळख पटली होती. त्याखबरीच्या आधारे चाळीसगाव शहर पोलिस स्टेशनला सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. सीआरपीसी १७४ नुसार ६१/२४ या क्रमांकाने ही नोंद घेण्यात आली. चाळीसगाव शहर पोलिस स्टेशनचे पो. नि. संदीप भटू पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भेट देत पुढील कारवाईसह तपासाला सुरुवात केली. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यातून मिळालेल्या कपड्यावरील रक्ताचा नमुना, दगडावरील रक्ताचे नमुने, रस्त्यालगत असलेली रक्तमिश्रीत माती, जवळच पडलेल्या रुमालावरील रक्ताच्या डागाचे नमुने,जमीनीवर मिळालेले ब्लेड आदी वस्तू तपासकामी ताब्यात घेण्यात आल्या. घटनास्थळावरील परीस्थीतीचे बारकाईने निरीक्षण केले असता मयतास कुणीतरी दगडाने ठेचून, ब्लेडने दुखापत करुन जीवे ठार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत होते. मयताच्या आधारकार्डावरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे त्याच्या नातेवाईकांचा न्यायडोंगरी दुरक्षेत्राच्या संबंधीत पोलिस अंमलदारांच्या मदतीने शोध घेण्यात आला. व्हाटसअॅपच्या माध्यमातून मयताच्या नातेवाईकांना मयताचे फोटो पाठवण्यात आले. ते फोटो बघून मयत इसम हा बाळू पवार हाच असल्याचे खात्री पटली. त्यामुळे पुढील तपासकामी मदतीसाठी मयताच्या नातेवाईकांना पोलिस स्टेशनला बोलावण्यात आले. मयत बाळू हा त्याची पत्नी वंदनासह शिर्डी येथे कामासाठी गेला होता अशी माहिती त्याच्या नातेवाईकांकडून पोलिसांना समजली. त्या माहितीच्या आधारे वंदना हिचा मोबाईल क्रमांक मिळवण्यात आला. तिच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्यात आला. ती स्वतः शिर्डी येथे असल्याचे तसेच बाळू हा न्यायडोंगरी येथे गेला असल्याचे सांगूनतिने पटकन तिचा मोबाईल फोन बंद केला. तिचे बोलणे व तिचे पटकन मोबाईल बंद करण्याचा प्रकार पोलिसांना संशयास्पद वाटला. त्यामुळे तिचे मोबाईल लोकेशन घेतले असता ती चाळीसगाव रेल्वे स्टेशन परिसरात असल्याची तांत्रीक माहिती मिळाली. त्यामुळे तिच्यावरील संशय अजूनच बळावला. पो.नि. संदीप भटू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने वंदना बाळू पवार हिला चाळीसगाव रेल्वे स्टेशन परिसरातून ताब्यात घेत पोलिस स्टेशनला आणले गेले. तिला तिच्या पतीची माहिती विचारली असता तिने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. त्यामुळे महिला पोलिस कर्मचा-याच्या समक्ष व मदतीने तिची सखोल चौकशी करण्यात आली. याशिवाय मयत बाळूचे वडील सिताराम बबन पवार तसेच इतर काही नातेवाईकांना देखील पोलिस स्टेशनला चौकशीकामी बोलावण्यात आले. सखोल चौकशीअंती वंदना पवार हिचे खोटे बोलणे फार वेळ तग धरु शकले नाही. अखेर तिने सत्य कथन करण्यास सुरुवात केली. तिने दिलेल्या माहितीच्या आधारे तिचा चुलत दिर गजानन पवार याला देखील न्यायडोंगरी येथून ताब्यात घेण्यात आले. चाळीसगाव शहर पोलिस स्टेशनला वंदना हिला बघताच त्याच्या मनात भिती निर्माण झाली. वंदना हिने आम्हाला सर्व काही खरे सांगितले आहे, तु देखील खरे काय ते आम्हाला सांग असा त्याला दम देण्यात आला. गजानन पवार हा देखील फार वेळ खोटे बोलू शकला नाही. त्याने तसेच वंदना हिने दिलेली माहिती मिळतीजुळती असल्याचे दिसून आले. मद्यपी बाळूची पत्नी वंदना व तिचा दिर गजानन पवार यांच्यात प्रेमाचे संबंध होते. या संबंधात बाळूचा अडसर दोघांना सुरु होता. त्यामुळे दोघांनी मिळून बाळूचा जीव घेतला. वंदनाने बाळूच्या पोटावर ब्लेडचे तर गजानन पवार याने चेह-यावर दगडाचे वार केले होते. या घटनेप्रकरणी सरकारतर्फे सहायक पोलिस निरीक्षक सागर ढिकले यांनी फिर्याद दिली. भाग ५ गु.र.न. २६६/२४ भा.द.वि. ३०२,२०१, १२० (ब),३४ नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. दोघा संशयीतांना अटक करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संदिप पाटील व त्यांचे सहकारी हे.कॉ. विनोद भोई करत आहेत. त्यांनास.पो.नि. सागर ढिकले, पोलिस उप निरीक्षक सुहास आव्हाड, पोउनि संदिप घुगे, पोउनि सुभाष पाटील, पोहेकॉ राहुल सोनवणे, योगेश बेलदार,पंढरीनाथ पवार, प्रवीण जाधव, अजय पाटील, पोना महेंद्र पाटील, भुषण पाटील, दिपक पाटील, रवींद्र पाटील, तुकाराम चव्हाण, पोकॉ प्रकाश पाटील, शरद पाटील, नंदकुमार महाजन, विजय पाटील, निलेश पाटील, अमोल भोसले, विनोद खैरनार, आशुतोष सोनवणे, रवींद्र बच्छे, राकेश महाजन, गोपाल पाटील, अमोल पाटील, समाधान पाटील, पवन पाटील, मनोज चव्हाण, ज्ञानेश्वर पाटोळे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोहेकॉ सुधाकर अंभोरे, पोना लक्ष्मण पाटील, राहुल पाटील, पोकॉ ईश्वर पाटील, महेश सोमवंशी तसेच सायबर पोलीस स्टेशनचे पोकॉ गौरव पाटील, मिलींद जाधव, फॉरेन्सीक टीमचे पोकॉ हरिष परदेशी, शिवराज नाईक, प्रमोद ठाकूर आदींचे सहकार्य लाभले.

## कमिशन बुडवण्याचा प्रयत्न प्राणावर...

माहिती नव्हते. त्याच्या घरी महाराष्ट्रातील रत्नागिरी येथील आकिब उर्फ शोकत खल्पे आणि पुणे येथील निखिल चंद्रकांत राजे या दोघांची कायम ये जा होती. दिओदिता फर्नांडिस याच्याशी त्या दोघांचा कसला तरी व्यवहार झाला होता. ते दोघे ही गोव्यात कमशिन बेसेसवर जमीन प्लॅट घेण्या देण्याचा व्यवहार करीत होते. दिओदिता फर्नांडिस याच्याबरोबर ही त्यांनी मागील काही महिन्यात कमिशन बेसेसवर व्यवहार केले होते. त्या व्यवहारातील कमशिन दिओदिता या त्यांना देण्यास कायम टाळाटाळ करीत असायच्या.त्यामुळे त्याची त्या दोघाबरोबर सारखी भांडणे होत होती. तरी ही ते दोघे त्याच्याबरोबर व्यवहार करीत होते.दिओदिता फर्नांडिस याची आर्थिक परिस्थीती तशी सधन होती. परंतु कोणत्या ही व्यवहारातील पैसे त्या नीट कुणाला देत नव्हत्या. शौकत खल्पे आणि निखिल राजे हे दोघे ही तसे महाराष्ट्रातील असल्याने आणि आपण मुळचे गोव्याचे असल्याने गोव्यातील कोणत्याही व्यवहारातील कमिशन आपल्याला जास्त मिळावे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे त्या दोघांशी त्याचे कधी पटत नव्हते. त्याच्यात वाद विवाद हा होत होता.त्यातच दिओदिता फर्नांडिस यांना आपली एक प्रॉप्रटी विकून दुसऱ्या ठिकाणी नवीन प्रॉप्रटी करायची होती. त्याच्या मनासारखी दुसरी प्रॉप्रटी काही केल्या त्यांना लवकर मिळत नव्हते. शौकत खल्पे आणि निखील राजे यांना त्यांनी आपल्यासाठी दुसरी प्रॉप्रटी शोधण्यास सांगितले. त्या त्यांना अगोदरच्या व्यवहारातील कमीशन देण्यास टाळाटाळ करीत होत्या त्यात आणि नवीन प्रॉप्रटीचा व्यवहार केला तर त्याच्यातील त्या कमिशन देण्यास टाळाटाळ करतील असे त्यांना वाटत होते. आतापर्यतच त्या दोघांचे त्याच्याकडून लाखो रूपयांचे कमिशन येणे होते. नवीन व्यवहार केले तर त्याचे कमीशन आणखी वाढणार होते. त्यात नव्याची भर कशाला त्याच्याकडून अगोदरचे कमिशन काढून घ्यायचे आणि त्यातून आपले अंग काढून घ्यायचे असा ही त्या दोघांनी विचार केलेला होता. त्या दोघांनी कितीही वेळा दिओदिता फर्नांडिस यांना आपल्या कमिशन विषयी विचारले, मागितले तरी त्या दोघांना झुलवत ठेवीत होत्या. काही तरी कारण सांगून त्यांना त्या कमिशन देण्याचे टाळत होते.त्यामुळे ते दोघे ही त्याच्याबरोबर किती वेळा वाद घालणार होते. एक तर त्या वयोवृध्द महिला आणि एकट्याच रहात असल्याने त्यांना काही करता ही येत नव्हते. त्यामुळे ते दोघे ही त्याच्यावर चिडून होते. काही केले तर ही बाई आपल्याला कमिशन देत नाही, उलट आपल्यावरच दोष ठेवीत काही ना काही कारण सांगून आपल्या हक्काची रक्कम कमिशन देत नाहीत. आता हिला कायमची अद्दल घडवायची,कारण घी, जब सिधे उंगली से नही निकलाता तो उंगली ठेडी करणी पडती है हे त्या दोघांना ही माहित होते. या बाईकडे इतकी प्रॉप्रटी आहे. मरताना काय ही बाई तिची प्रॉप्रटी आपल्याबरोबर नेणार नाही, पण ती मुद्दामच आपल्याला आपले कमिशन देत नाही त्यामुळे तिला आता काही केल्या सोडायचे नाही. शुक्रवार दि.२३ रोजी पुण्याहून निखिल राजे हा रत्नागिरीला शौकत खल्पे याच्याकडे आला. तेथून ते दोघे दिओदिता फर्नांडिस याच्याकडे जाऊन आज आपले कमिशन वसुल करायचे या विचाराने ते दोघे ही त्या राहत असलेल्या नायकवाड येथील बेन्सन इमारतीत रात्री ९च्या सुमारास आले. त्यावेळी त्या आपल्या घरी एकटयाच होत्या. ते दोघे त्याच्या घरी येण्याअगोदर काही वेळापूर्वी दिओदिता फर्नांडिस याच्या बहिणीचा नवरा त्याच्या घरी येवून गेला होता. शौकत खल्पे आणि निखिल राजे हे दोघे ज्यावेळी त्याच्या घरी आले. त्यावेळी फर्नांडिस या थोडया ड्रिंकमध्ये होत्या. त्यामुळे ते दोघे काय बोलत आहेत आपल्याला काय विचारत आहेत याचे त्यांना भान नव्हते. त्या दोघांना आपल्या घरी बघून त्या त्याच्यावर चिडल्या.अगोदरच त्यांचा स्वभाव हा रागीट आणि तापट असल्याने त्या दोघांना मी तुमचे कमिशन यावेळी देणार नाही. उगाच तुम्ही माझ्याशी वाद घालू नका. मी सांगितलेल्या प्रॉप्रटीचे काम अगोदर करा आणि नंतर तुमच्या कमिशनचे बोला असे त्या दोघांना म्हणाल्या. आज देखील ही बाई आपले कमिशन देणार नाही याचा अर्थ तिला आपल्याला कमिशन दयायचे नाही, तिला आपले कमिशन बुडवायचे आहे असा त्यांनी अर्थ काढला. रागाच्या भरात असणाऱ्या शौकत खल्पे आणि निखिल राजे यांनी मारहाण करायला सुरूवात केली. तसे त्या ओरडू लागल्या. त्याचेवळी शौकत याने त्यांना बेडवर ढकलून त्याचे हात धरले. तर निखिल राजे याने त्याच्या तोंडावर हात ठेवीत त्याचे तोंड दाबुन धरत त्याचा गळा आवळून धरला.त्या शरिराने धष्टपुष्ट असल्याने त्या दोघांचा त्या जोरात प्रतिकार करू लागल्या. ही बाई आपल्याला काही आवरणार नाही म्हणून शौकत खल्पे याने तिचे पाय सोडून बाजुलाच पडलेली एक दोरी घेतली आणि ती दोरी दिओदिता फर्नांडिस याच्या गळयाभोवती जोरात आवळली.तसे त्याचा श्वास मंदावत गेला.त्याची धडपड थांबली. त्याचा जागीच मृत्यू झाला. आता ते दोघे ही घाबरले. या लफडयात आता आपण अडकणार म्हणून त्यांनी तेथून कौता पाय घ्यायचा ठरविले. त्यांना तेथेच टाकून त्या दोघांनी तेथून पोबारा करताना जाताना त्यांनी त्याच्या प्लॅटचा दरवाजा बंद करून बाहेरून त्याला कडी लावली आणि रात्रीच्या अंधारात कोणाला काही समजणार नाही अशा पध्दतीने निघून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे त्याच्या बहिणीचा नवरा त्याच्या घरी आल्यावर त्यांना फर्नांडिस याच्या प्लॅटला बाहेरून कडी लावल्याचे दिसले. त्यांनी ती कडी काढून दरवाजा उघडून आत जावून पाहिले तर बेडवर उताण्या अवस्थेत निपचिप पडल्याचे दिसले. त्यांनी त्यांना हलवून पाहिले तर त्यांच्याकडून त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी या घटनेची माहिती जवळच्या कळगुंट पोलीसांना आणि आपल्या नातेवाईकांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी कळगुंट येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले. प्रथम दर्शनी पोलीसांना त्याचा मृत्यू हा नैसग्रीक झाला असेल असे वाटत होते. परंतु पोस्ट मार्टम रिपोर्टमध्ये त्याचा गळा आवळला गेल्याचे नमुद केल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांना दिओदिता फर्नांडिस याचा नैसग्रीक मृत्यू नसून त्याचा गळा आवळून खून केल्याचे समजल्यावर पोलीसांनी याचा तपास चालू केला. मयत दिओदिता फर्नांडिस या एकटयाच राहत असल्याने त्याचा खून कुणी तरी चोरीच्या उद्देशाने केला असावा असा अंदाज बांधून पोलिसांनी तपास चालू ठेवला. परंतु तपासाअंती तशी शक्यता ही मावळली. कारण त्याच्या घरातील वस्तु सोन पैसा जशाच्या तश्या होत्या. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत दिओदिता फर्नांडिस या प्लॅट खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत होत्या याची माहिती पोलिसांना मिळाली. या व्यवसायातील संबंधामुळे त्याच्याकडे दोन तरूणांची नेहमी येणे जाणे होते आणि त्या दोघाबरोबर त्याची नेहमी वाद विवाद आणि भांडणे होत असल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी घटनास्थळा वरील प्लॅटमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यांना त्या फुटेजमध्ये दोन तरूण घटनेच्या वेळी आत येत असताना आणि जात असताना दिसत होते. हे दोघे तरूण गोव्या शेजारील महाराष्ट्र राज्यातील असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यावर त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. घटनेनंतर पळून जाण्याच्या तयारीत असणाऱ्या या दोघांना पोलीसांनी कळगुंट परिसरातून ताब्यात घेतले. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती त्यांनी पोलीसांना दिली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत दिओदिता फर्नांडिस याच्या बहिणीच्या नवऱ्याकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिओदिता फर्नांडिस (वय ६४) याच्या खून प्रकरणी आकिब उर्फ शोकत खल्पे (वय ३५) रा.रत्नागिरी आणि निखिल चंद्रकांत राजे (वय ३०) रा.पुणे याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना म्हापसा येथील कोर्टात पोलीसांनी उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली दोरी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास कळगुंट पोलीस करीत आहेत.

## असहाय्य विवाहितेची जराही नव्हती ...

कामात व्यस्त असताना कोणी तरी सकाळी अज्ञात व्यक्तीने पोलीस ठाण्यात फोन करून कळविले की, मानखुर्द मधील महाराजनगर भागात एका गोणीमध्ये मानवी जातीचा संशयास्पद मृतदेह पडला आहे. ही माहिती मिळताच सकाळी ११ वाजता ट्रॉम्बे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) फरीद खान, सपोनि सचिन काटकर, केदार वायचळ, सुशील लोंढे, नवनाथ काळे, दिपक दळवी इत्यादी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी जाऊन त्यांनी पंचसमक्ष ती गोणी उघडून पहिली असता, त्यामध्ये छिन्नविच्छिन्न अवस्थेतील एका अनोळखी महिलेचा मृतदेह अर्धवट कुझलेल्या स्थितीत आढळून आला. साधारण तीन-चार दिवसांपूर्वी या अनोळखी महिलेची हत्या करून तिचा मृतदेह फेकण्यात आला असावा असा अंदाज व्यक्त करण्यात आला. पोलिसांनी प्रेताचे बारकाईने निरीक्षण करून मृतदेहाचा घटनास्थळी पंचनामा केला. या प्रकरणी ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात कलम १०३(१), २३८ भारतीय न्याय संहितेअन्यचे खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला. एका अनोळखी महिलेचा मृतदेह मिळून आल्याने तिची ओळख पटवण्यासाठी आणि गुन्ह्यातील आरोपीं शोध घेण्यासाठी परिमंडळ ६ चे पोलीस उपायुक्त हेमराजसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रॉम्बे विभागाचे सहायक पोलीस आयुक्त राजेश बाबशेट्टी व नेहरूनगर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त शशिकांत भंडारे या २ सहायक पोलीस आयुक्तच्या नेतृत्वाखाली १० पथके तयार करण्यात आली. या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे अथक परिश्रम करून २४ तासाच्या आत मिळून आलेल्या माहितीच्या आधारावर अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्यात यश मिळविले. रेश्मा कन्हैयालाल जैस्वाल असे मृतक महिलेचे नाव असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी रेश्माच्या पतिकडे व तिच्या सासूकडे चौकशी केली. तेव्हा ते उलसुलत उत्तरे देऊन पोलिसांची दिशाभूल करत असल्याचे व आपल्या पासून काहीतरी लपून ठेवत असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. म्हणून पोलिसांनी तिचा पती, दोन मेहुणे, सासू आणि पतीच्या बहिणीला ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली. तेव्हा कुठे ते पोपटासारखे बोलू लागले. कन्हैयालाल भैलाल जैस्वाल उर्फ लाला हा आई,भाऊ आणि बहिणीसह ट्रॉम्बे परिसरात राहत होता. कन्हैयालाल भैलाल जैस्वाल याचा विवाह रेश्मा या तरूणी सोबत पारंपरिक पद्धतीने साजरा झाला होता. लग्नानंतर दोघेही पतिपत्नी सुखाने संसार करत होते. मात्र काही दिवसांतच कुटुंबातील लोकांनी तिचा छळ सुरू केला. परंतु रेश्माने कधीही तिच्या आईवडीला कडे याबाबत तक्रार केली नाही. नवीन नवीन लग्न झाले की, काही दिवस स्त्रियांना हा त्रास सहन करावा लागतो. असे समजून रेश्माही घरातील पती, सासू व नणंद याचा त्रास सहन करत होती आणि मुकाट्याने घरातील सर्व कामे करीत होती. परंतु सासू आणि नणंद क्षुल्लक करणाहून तिचा पाणउतारा करत असे. कामधंद्यावरून बोलत असे. त्यामुळे तिची घरात पुरती कोंडी झाली होती. रोजरोज घरात सुरू असलेली कटकट तिला सहन होत नव्हती. त्यामुळे ती उलटून सासू, नणंद, दिर आणि पतीला उलट उत्तरे देऊ लागली. रेश्मा तोंड वर करून बोलू लागल्याने या सर्वांना तिचा राग आला. या रागाच्या भरात या सर्वांनी तिला बेदम मारहाण केली. या मारहाणीत तिचा मृत्यू झाला. त्यामुळे हे सर्व घाबरून गेले. त्यांनी तिच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी रेश्माचे प्रेत एका प्लॅस्टिक पिशवीत भरले आणि रात्र झाल्यावर ते प्रेत मानखुर्द मधील महाराजनगर परिसरात फेकून दिले. अशी धक्कादायक कबुली दिली. या प्रकरणी ट्रॉम्बे पोलिसांनी २४ तासाच्या आत मृतक रेश्मा कन्हैयालाल जैस्वाल हिचा पती कन्हैयालाल भैलाल जैस्वाल उर्फ लाला, दिर अशोक भैलाल जैस्वाल उर्फ चिंटू, नणंदई रवी उर्फ प्रेमकुमार रामयालाल श्रीवास्तव, नणंद मुन्नी रामयालाल श्रीवास्तव आणि नणंदची सासू रेश्मा रामयालाल श्रीवास्तव या पाच जणांना अटक केली आहेत. आरोपींमध्ये तीन पुरुष आणि दोन महिलांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले. हे पाच आरोपी मृत महिलेचे नातेवाईक असून यामध्ये महिलेचा पती, दीर, नंदोई, नंदोइची आई व बहिण असून सदर गुन्हा प्रथमदर्शनी कौटुंबिक वादातून झाल्याचे दिसून येत आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे. ही उल्लेखनीय कामगिरी मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त, देवेन भारती, सह पोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग, डॉ.महेश पाटील, परिमंडळ ६ चे पोलीस उप आयुक्त हेमराज सिंह राजपुत यांचे मार्गदर्शनाखाली ट्रॉम्बे विभागाचे सहायक पोलीस आयुक्त, राजेश बाबशेट्टी, नेहरूनगर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त शशिकांत भंडारे, ट्रॉम्बे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) फरीद खान, सपोनि सचिन काटकर, केदार वायचळ, सुशील लोंढे, नवनाथ काळे , दिपक दळवी, प्रशांत मोरकाने, भोसले व पोउनि शरद नाणेकर, भाउसाहेब माळवदकर, विजयसिंह देशमुख, ऋषिकंश बाबर, अजय गोल्हार, अभय काकड, अनिल बांगर, अमोल चाटे, अनिल महारनुर, गणेश कर्चे, राजू साळुंखे व पथक यांनी केली आहे.

## चोरांची लिफ्ट घेऊन विनाकारण फसला..

आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी नितीन वाघे (४०), पद्माकर भोईर (२०) आणि अजय मांजे (२१) यांना अटक केली आहे. भिवंडी येथील हऱ्याचा पाडा परिसरात विनोद हा वास्तव्यास होता. शहापूर येथील आश्रम शाळेत इयत्ता नववीमध्ये तो शिक्षण घेत होता. त्याच्या वडिलांचे निधन झाल्याने तसेच आईने दुसरा विवाह केला. त्यामुळे त्याला कुटुंबियांनी शिकण्यासाठी आश्रम शाळेत ठेवले होते. काही महिन्यांपूर्वी त्याला त्याच्या आईने १५ हजार रुपये किमतीचा मोबाईल घेऊन दिला होता. रक्षा बंधनाचा सण असल्याने तो त्याच्या काकांकडे राहण्यासाठी आला होता. १८ ऑगस्टला त्याला काकांनी खरेदीसाठी १०० रुपये देऊन बाजारातून साहित्य आणण्यास सांगितले. रात्री उशीरपर्यंत तो घरी आला नव्हता. दुसऱ्या दिवशी त्याच्या काकांनी आश्रम शाळेत विचारणा केली असता, तो आश्रम शाळेत देखील परतला नव्हता. अखेर २१ ऑगस्टला त्याच्या काकांनी तो बेपत्ता असल्याची तक्रार पडघा पोलीस ठाण्यात दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पडघा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही तपासले. त्यावेळी दुचाकीवर विनोदला एक व्यक्ती नेत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी दुचाकी क्रमांकाच्या आधारे माहिती घेतली असता, तो व्यक्ती नितीन वाघे असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी वाघे याला २४ ऑगस्टला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने इतर दोघांच्या मदतीने त्याचा खून केल्याची कबूली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याचे साथिदार पद्माकर आणि अजय या दोघांनाही ताब्यात घेतले. तिघांनाही पडघा पोलिसांनी अटक केली आहे. हत्येनंतर त्यांनी विनोदचा मृतदेह वाडा येथील माळरानात फेकून दिला होता. त्याचा मृतदेह पोलिसांना आढळून आला आहे. विनोद हा मोबाईल घेऊन बाजारात गेला होता. बाजारात जाण्यासाठी विनोद याने नितीन याची दुचाकी थांबवून बाजारात सोडण्याची विनंती केली. परंतु त्याने त्याला वाडा येथील माळरानात नेले. तिथे नितीन आणि त्याच्या साथिदारांनी त्याचा गळा आवळून हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह माळरानात फेकून दिला. तसेच त्याचा मोबाईल आणि १०० रुपये घेऊन तेथून निघून गेले.

क्राईम संध्या | सोमवार दि. २ सप्टेंबर २०२४ ते रविवार दि. ८ सप्टेंबर २०२४ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

## वाढवण बंदराचा पायाभरणी आणि १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पांचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ

# वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचे आर्थिक चित्र बदलणार-प्रधानमंत्री नरेंद्र मोदी





**पालघर/प्रतिनिधी**

देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासात मच्छिमार बांधवांचे मोठे योगदान आहे. वाढवण बंदर हा जगातील सर्वात खोल व मोठ्या बंदरांपैकी एक महत्त्वपूर्ण बंदर होणार आहे. या प्रकल्पामुळे या परिसराचे आर्थिक चित्र बदलणार आहे. आता हा परिसर रेल्वे व महामार्गांशीही जोडला जाणार असून यामुळे या परिसरात नवनवीन व्यापार सुरू होतील. या बंदराचा लाभ महाराष्ट्राबरोबरच या भागातील स्थानिकांना व त्यांच्या पुढील पिढ्यांना होणार आहे, असे प्रतिपादन देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले. सुमारे ७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ तसेच १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पाचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पालघरमधील सिडको मैदानात आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय बंदर विकास, जहाज व जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन राज्यमंत्री जॉर्ज कुरियन, केंद्रीय बंदर विकास, जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, बंदर विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार श्रीनिवास वनगा, आमदार निरंजन डावखरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेश वाघ, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते स्थानिक मच्छिमार, शेतकऱ्यांना ट्रान्सपॉड व किसान क्रेडिट कार्डचे वाटप करण्यात आले.

**मराठी भाषेतून संवाद साधत भाषणाची सुरवात**

सर्व लाडक्या बहिणी व भावांना तुमच्या या सेवकांचा नमस्कार, अशा शब्दांत मराठी भाषेतून संवाद साधत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी संत सेनानी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वंदन करून भाषणाची सुरूवात केली. सिंधुदुर्ग येथील घटनेबद्दल छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरणाशी मस्तक टेकून मी माफी मागतो, असे सांगून प्रधानमंत्री पदासाठी नाव घोषित झाल्यानंतर मी सर्व प्रथम रायगड येथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीवर जाऊन प्रार्थना केली होती. भक्तिभावाने आशिर्वाद घेऊन राष्ट्रसेवेला प्रारंभ केला. छत्रपती शिवाजी महाराज हे माझ्यासाठी व माझ्या सहकाऱ्यांसाठी आराध्य दैवत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. आजचा दिवस हा विकसित महाराष्ट्र विकसित भारत संकल्पनेसाठी महत्त्वाचा दिवस आहे. राज्याच्या विकास यात्रेतील हा एक ऐतिहासिक दिवस असल्याचे सांगून श्री. मोदी म्हणाले की, महाराष्ट्राला एक समृद्ध व संसाधनयुक्त समुद्रकिनारा लाभला आहे. या समुद्र किनाऱ्यावरून आंतरराष्ट्रीय व्यापार होत असून यामुळे भविष्यातही मोठ्या संधी निर्माण होणार आहे. त्यामुळेच ७६,२०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाचा, देशातील सर्वात मोठे बंदर वाढवणमध्ये उभारण्याचा निर्णय घेतला आहे. देशभरातील सर्वच बंदरामधून जेवढी कंटेनर वाहतूक होते, त्यापेक्षाही जास्त कंटेनर वाहतूक एकट्या वाढवण बंदरातून होणार आहे. हे बंदर देशाच्या व्यापार व औद्योगिक प्रगतीचे मोठे केंद्र बनणार आहे. वाढवण बंदरामुळे या परिसराचा चेहरामोहरा बदलणार असून एक नवी ओळख निर्माण होईल. तसेच हा परिसर वेस्टर्न फ्रेट कॉरिडॉर, दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर यांना जोडला जाणार आहे. यामुळे वाढवण बंदरात वर्षभर कंटेनरची वाहतूक होणार आहे. या क्षेत्राची ओळख पूर्वी किल्ल्यांमुळे होत होती आता ही ओळख आधुनिक पोर्टमुळे होणार आहे.

**वाढवण बंदरामुळे १२ लाख रोजगार निर्माण होणार**

मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत या संकल्पनांचा लाभ महाराष्ट्राला होत असून यामध्ये महाराष्ट्राचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. वाढवण बंदरामुळे लाखो रुपयांची गुंतवणूक या परिसरात होणार असून सुमारे १२ लाख रोजगार निर्माण होणार आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्राच्या विकासासाठी केंद्र शासनाने नेहमीच मोठे निर्णय घेतले. महाराष्ट्राचा विकास ही माझ्यासाठी सर्वात प्राधान्याची गोष्ट आहे. त्यामुळेच नुकतेच आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यात दिघी येथे बंदर औद्योगिक क्षेत्राला मंजुरी दिली आहे. ही महाराष्ट्रातील नागरिकांसाठी आनंद द्विगुणित करणारी गोष्ट आहे. दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्र हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वप्नाचे प्रतिक बनेल. या पोर्टमुळे पर्यटन व इको रिसोर्टला चालना मिळेल, असेही प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी यावेळी सांगितले.

**छत्रपती शिवाजी महाराजांमुळे सागरी ताकदीला वेगळी ओळख**

मच्छिमार बांधवांसाठी आज ७०० कोटीहून अधिक योजनांचा शुभारंभ केला आहे. तसेच वाढवण बंदर, दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, विविध मत्स्य व्यवसायाच्या योजनांचा शुभारंभ ही मोठमोठी कामे ही माता महालक्ष्मी, माता जिजाऊ, माता जीवदानी व भगवान तुंगारेश्वर यांच्या आशिर्वादने होत आहेत, असेही श्री. मोदी म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी ताकदीला एक वेगळी ओळख दिली. सरखेल कान्होजी आंग्रे यांनी ईस्ट इंडिया कंपनीला धडकी भरवली होती. त्यांच्या या वारसाकडे नंतरच्या काळात लक्ष दिले गेले नाही. पण आजचा भारत हा नवीन भारत आहे. नवीन भारत देशात अनेक बदल घडवीत आहे. नवीन भारत आपल्या सामर्थ्याला व गौरवांना ओळखतो. सागरी क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करत आहोत. देशातच जहाज निर्मिती होण्यासाठी व रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न केले. त्यातून या क्षेत्रात कोट्यावधींची गुंतवणूक करत आहोत. यामुळे जहाज वाहतुकीचा वेळ कमी होत असून याचा फायदा व्यापारी व उद्योगांना होत असून तरुणांना नवी संधी मिळत आहे. देशातील बंदरांची क्षमता दुप्पट झाली आहे, असेही त्यांनी सांगितले. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मत्स्य उत्पादन करणार देश झाला असून मत्स्य उत्पादनातही गेल्या नऊ वर्षात दुप्पट वाढ झाली आहे. झिंगाची निर्यातही दुप्पट झाली आहे. मत्स्य उत्पादन क्षेत्रात महिलांचे योगदान वाढविण्यात केंद्र शासन अग्रेसर असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**देशाच्या विकासात आदिवासी व मच्छिमार बांधवांचे मोठे योगदान**

देशाच्या विकासात आदिवासी व मच्छिमार बांधवांचे योगदान मोठे आहे. सागरी क्षेत्रातील विकासात मच्छिमार बांधवांचे योगदान आहे. ५२६ गावे, कोळीवाडे आणि १५ लाख मच्छिमारांच्या लोकसंख्येसह महाराष्ट्राचे मत्स्य पालन क्षेत्रातील योगदान खूप मोठे आहे. त्यामुळेच आमच्या सरकारने आदिवासी तसेच मच्छिमारांसाठी वेगळे मंत्रालय निर्माण केले आहे. मच्छिमार बांधवांचे जीवनमान सुधारण्याला प्राधान्य दिले असून त्यांच्या हितासाठी योजना बनविण्यात येत आहेत. मच्छिमार बांधवांचे सामर्थ्य वाढविण्यासाठी मच्छिमार संस्था मजबूत करत असल्याचेही त्यांनी सांगितले. आज शुभारंभ केलेल्या मत्स्य व्यवसाय विभागाच्या योजना तसेच प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेमुळे मच्छिमार बांधवांचे जीवनमान सुधारून आर्थिक संपन्नता येणार आहे. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

**वाढवण बंदर प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

वाढवण बंदर या प्रकल्पासाठी ७६,२०० कोटी रुपये खर्च येणार आहे. वाढवण हे भारतातील सर्वात मोठे खोल पाण्याचे बंदर बनणार आहे. हा प्रकल्प जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करण्याबरोबर आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी व्यापार कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अमृतकाल दृष्टिकोनासाठी महत्त्व पूर्ण प्रकल्प आहे. पश्चिम किनाऱ्यावर स्थित वाढवण बंदर आंतरराष्ट्रीय शिपिंग मार्गांना थेट कनेक्टिव्हिटी निर्माण करेल आणि पारगमन वेळ आणि खर्च कमी करेल. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांनी सुसज्ज असलेल्या या बंदरात डीप बर्थ, कार्यक्षम कार्गो हाताळणी सुविधा आणि आधुनिक बंदर व्यवस्थापन प्रणाली असणार आहे. या बंदराच्या उभारणीमुळे अमृतकाल दरम्यान भारताच्या व्यापक आर्थिक उद्दिष्टांशी जुळवून घेऊन रोजगाराच्या लक्षणीय संधी निर्माण होणार आहेत. या प्रकल्पामुळे सुमारे १० लाखाहून अधिक रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे. स्थानिक व्यवसायांना चालना मिळणार असून या प्रदेशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासात योगदान मिळणे अपेक्षित आहे. वाढवण बंदर प्रकल्पामध्ये शाश्वत विकास पद्धतींचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामध्ये पर्यावरणीय प्रभाव कमी करणे आणि कठोर पर्यावरणीय मानकांचे पालन करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर, हे बंदर भारताची सागरी कनेक्टिव्हिटी वाढवेल आणि जागतिक व्यापार केंद्र म्हणून त्याचे स्थान आणखी मजबूत करणार आहे. वाढवण बंदर प्रकल्प हा बंदर वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालय आणि महाराष्ट्र सरकारचा खाजगी क्षेत्रातील भागीदारांच्या सक्रिय सहभागासह संयुक्त उपक्रम आहे. बंदर टप्प्याटप्प्याने कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे, पहिला टप्पा २०२८ पर्यंत पूर्ण होणार आहे.

**मत्स्यपालन पायाभूत सुविधा प्रकल्प**

मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे याच कार्यक्रमात ७५७.२७ कोटी रुपयांच्या महत्त्वाच्या मत्स्यपालन पायाभूत सुविधा प्रकल्पांची पायाभरणी करत आहेत. यामध्ये मासेमारी बंदरांचे आधुनिकीकरण आणि फिश मार्केटचे बांधकाम यांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे मासे आणि सीफूडच्या काढणीनंतरच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधा आणि स्वच्छताविषयक परिस्थिती प्रदान करण्यात येणार आहे. या क्षेत्रांमध्ये मासेमारी उद्योगासाठी पायाभूत सुविधा आणि सुविधा वाढवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आंध्र प्रदेश, केरळ आणि ओरिसा या राज्यांमध्येही लागू केले जाणार आहे.

**मासेमारी बोटींवर ट्रान्सपॉन्डर बसविण्याचा शुभारंभ**

३६४ कोटी रुपये खर्चून एक लाख मासेमारी बोटींवर ट्रान्सपॉन्डर बसवण्याच्या योजनेचा देखील मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी शुभारंभ करण्यात आला. समुद्रातील मच्छिमारांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि संकटाच्या वेळी त्यांना संवाद साधता यावा यासाठी हे स्वदेशी ट्रान्सपॉन्डर इस्रोने विकसित केले आहेत. स्वदेशी ट्रान्सपॉन्डरमुळे समुद्रात गेलेल्या मच्छिमारांना संकटकाळात संपर्क साधण्यास व मदत पोचविण्यास सहाय्य होणार आहे.

## टोलनाका येथे खैराची चोरटी वाहतूक करणारा टेम्पो व कार जप्त





**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यात अनेक दिवसांपासून मंदावलेली खैराची चोरटी वाहतूक पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचे पाहायला मिळाले असून कंचाड वनपरिक्षेत्रातील वाघोटे गावाच्या हद्दीतील टोलनाका येथे खैराचे ओंडके घेऊन जाणाऱ्या टेम्पोवर वनविभागाने कारवाई केली. शनिवारी(दि.३१) पहाटेच्या सुमारास झालेल्या या कारवाईतील गाडीत खैर प्रजातीचे १०७ नग सोलीव ओंडके असून यातील चोरटे मात्र अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले आहेत. वाडा तालुक्यातील खैर या मौल्यवान व सध्या दुर्मिळ होऊ लागलेल्या प्रजातीची चोरटी वाहतूक काहीशी मंदावलेली असतांना शुक्रवारी पहाटेच्या सुमारास वनविभागाच्या कंचाड वनपरिक्षेत्रातील वनाधिकार स्वप्नील मोहिते यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अंभई वनक्षेत्रात चोरटी तोड होणार आहे अशी खबर मिळाली. त्यानुसार वनविभागाचे कर्मचारी गस्त घालत असतांना वाडा मनोर महामार्गावर दोन किलो मिटर अंतरावर सापळा रचून वाघोटे टोलनाक्यावर एक आयषर टेम्पो व स्विफ्ट कार वाड्याच्या दिशेने येत असताना दिसली मात्र वनविभागाची चाहूल लागताच हे चोरटे दोन्ही गाड्या सोडून पळून गेले. वनविभागाकडे जप्त असलेल्या या गाडीत खैर प्रजातीचे १०७ ओंडके, स्विफ्ट कार व आयषर असा एकूण लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चोराट्यांचा वनविभाग तपास करीत आहेत. वन अधिकारी स्वप्नील मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल जाधव, वनरक्षक खान, बहिर, केदार, आतकरी, धानवा, वरठा, वनमजूर नितीन, आकाश व प्रकाश यांनी ही कारवाई केली.

## डॉ.बेंडाळे महिला महाविद्यालयात दहीहंडी उत्सव जल्लोषात साजरा





**जळगाव/प्रतिनिधी**

डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव येथे आज २७ रोजी गोपाळकाल्याच्या निमित्ताने दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा.डॉ.गौरी राणे मॅडम यांनी दहीहंडी उत्सवाचे उद्घाटन करून उपस्थित महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींच्या गोविंदा पथकाला मार्गदर्शन केले. तसेच दहीहंडी या साहसी खेळाबद्दल विवेचन केले. त्यांच्या मनोगतात त्यांनी दहीहंडी या उत्सवाची सांस्कृतिक पार्श्वभूमी तसेच त्यामागे असलेल्या शारीरिक कसरत, नियमित सराव, प्रसंगावधान, वेळेची अचूकता व सांघिक भावना या गोष्टी दहीहंडी या क्रीडा प्रकारामध्ये व आपल्या जीवन व्यवहारांमध्ये किती महत्त्वाच्या असतात याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर गोविंदा पथकाने एकावर एक थर लावून डीजेच्या गाण्यांच्या तालावर ठेका घेत आनंदोत्सवात दहीहंडी उत्सव साजरा केला. याप्रसंगी महाविद्यालयातील उप-प्राचार्य डॉ.व्हि.जे पाटील सर व डॉ.पी.एन. तायडे सर तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व पदाधिकारी, सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थिनी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थितीत लावत विद्यार्थिनींच्या दहीहंडी उत्सवात प्रोत्साहन देण्यासाठी सहभाग नोंदविला. दहीहंडी उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील क्रीडा संचालक डॉ. अनिता कोल्हे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले, प्रा. छाया चिरमाडे, जिमखाना समितीच्या सर्व प्राध्यापक सहकारी सदस्य यांनी परिश्रम घेतले.

## मोकाट भटक्या कुत्र्यांना आवरण्याची गरज

**विरार/प्रतिनिधी**

विरार शहरात सर्वत्र भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव वाढत असून मोठ्या संख्येने भटकी कुत्री जिथे तिथे बोकाळलेली आहेत. त्यांना दिवसभर खायला कोणी द्यायचे? हा प्रश्न आहे. त्यांच्या शहरात भूक वाढली म्हणजे ते पिसाळतात व भुंकत माणसांवर व वाहनांवर हल्ला करतात त्यामुळे अपघात घडतात. पालिकेचे अनेकदा मागणी करुनही या विषयाकडे दुर्लक्ष होत आहे. पूर्व फूलपाडारोड, द्वारका नगरी ते फुलपाडा धरण या पाऊण किलोमीटर मार्गावर मोठ्या प्रमाणात कुत्र्यांची पैदास झालेली आहे. जाणाऱ्या-येणाऱ्या सर्वच वाहनांवर भुंकत झडप मारणे व त्यामुळे नागरीकांना अपघात होणे नित्याचेच झाले आहे. शाळेत येणाऱ्या मुलांवरही हे कुत्रे हल्ला करतात. तसेच त्यांच्यातीलच भांडणात ते एकमेकांवर तुटून पडतात. त्यामुळे रस्त्यावरुन चालणाऱ्या पादचार्यांची देखील धांदल उडते. पुढे गणेशोत्सवासारखा सण आला आहे. त्यामुळे मिरवणुका निघतात. श्रींचे आगमन वाजत-गाजत रस्त्याने होते. त्यांना कुत्र्यांपासून नुकसान होऊ नये यासाठी दक्षता घेण्याची गरज आहे. सणासुदीला मोठ्या प्रमाणात नागरीक व लहान मुले सतत रस्त्यावर बाहेर पडतात. त्यांना कुत्र्यांपासून इजा होऊ शकते. या विषयाबाबत गांभीर्याने कारवाई करुन डॉग वॅन पाठवून वेळीच या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी माजी नगरसेवक विलास चोरघे यांनी केली आहे.

## विरार येथे क्लासमधील मुलीचा लैंगिक छळ करणाऱ्या शिक्षकाला चोप देत काढली धिंड!

**विरार/प्रतिनिधी**

कोचिंग क्लासेसमध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ करणार्ऱ्या प्रमोद मोर्या या शिक्षकाला नागरिकांनी बेदम चोप देत पोलिसांच्या हवाली केली. बुधवार सकाळी विरार पूर्वेच्या मनवेलापाडा येथे ही घटना घडली. संतप्त नागरिकांनी केलेल्या मारहाणीत हा आरोपी शिक्षक गंभीर जखमी झाला आहे. विरार पूर्वेच्या मनवेल पाडा येथील सह्याद्री नगरमध्ये प्रमोद मोर्या हा एक खाजगी कोचिंग क्लास चालवतो. यामध्ये सातवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय मुलीचा मागील आठवड्यात शिक्षक लैंगिक छळ करत होता. त्यामुळे ती घाबरून दोन दिवस क्लासला गेली नव्हती. ती क्लासला का जात नाही म्हणून तिच्या पालकांनी तिला विचारणा केली तेव्हा तिने हा प्रकार



सांगितला. त्यामुळे तिचे पालक आणि परिसरातील संतप्त नागरिक क्लास मध्ये गेले आणि शिक्षक प्रमोद मोर्या याला बेदम चोप देत भर रस्त्यात धींड काढली. या मारहाणीत मोर्या रक्तबंबाळ झाला आहे. या शिक्षकाने ३-४ मुलींचा यापूर्वी असाच लैंगिक छळ केला आहे. पण अन्य मुली घाबरतात याची चौकशी करा आणि आरोपीला कडक शिक्षा करा अशी मागणी आरती पडवळ या स्थानिक महिलेने केली आहे. हा प्रकार अत्यंत संतापजनक आहे. आम्ही मुलांना शिक्षकांकडे शिकविण्यासाठी विश्वासने पाठवतो परंतु ते असा घृणास्पद प्रकार करत आहे. हा नागरिकांच्या संतपाचा उद्रेक होता म्हणून त्याला बेदम मारहाण करत धिंड काढली, असे स्थानिक कार्यकर्ते मनिष राऊत यांनी सांगितले. नागरिकांनी आरोपीला आमच्या ताब्यात दिले आहे. त्याने मुलीची छेड काढून लैंगिक छळ केल्याचा आरोप पीडित मुलीने केला आहे. तिचा जबाब नोंदवत असून आरोपीवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी दिली.

## महिलेची इमारतीवरुन उडी मारुन आत्महत्या

**कल्याण/प्रतिनिधी**

घटस्फोट झाल्याने मानसिक तणावाखाली असलेल्या एका ३७ वर्षाच्या महिलेने बुधवारी दुपारी राहत्या घराच्या इमारतीच्या गॅलरीमधून तळ मजल्याला उडी मारून आत्महत्या केली. जमिनीवर जोरात आदळल्याने या महिलेचा जागीच मृत्यू झाला. या महिलेला तातडीने नातेवाईकांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात नेले. तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या मुलीचे वयोवृध्द वडील प्रभाकर शेट्टी यांनी याप्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली.

पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे. प्रभाकर यांच्या मुलीचा विवाह झाला होता. नंतर तिचा घटस्फोट झाला होता. ती कल्याणमधील घरी वडिलांबरोबर राहत होती. घटस्फोट झाल्याने मयत महिला सतत मानसिक तणावाखाली होती. बुधवारी दुपारी मयत महिलेने स्वताच्या शयन गृहातील खोलीतून गॅलरीत जाऊन अठराव्या मजल्यावरून जमिनीवर उडी मारली. वरून जोराने पडल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. घडला प्रकार प्रभाकर यांच्या मुलाने वडिलांना सांगितला. त्यांनी तातडीने रहिवाशांच्या मदतीने जखमी मुलीला रुग्णालयात आणले. तेथे ती मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याप्रकरणी आपला कोणावरही संशय नसल्याचे वडील प्रभाकर यांनी तक्रारीत म्हटले आहे.

02 TO 08 SEPTEMBER 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 8/31/2024 8:29 PM Page 1



# महाराज त्यांना माफ करू नका!

राष्ट्र पुरुषांचा राजकारणासाठी होणारा वापर अत्यंत निंदनीय आहे. परंतु या देशात कुठल्याही राजकीय पक्षाचे आणि त्यांच्या नेत्यांचे कर्तुत्वच नसल्यामुळे, या लोकांना राष्ट्रपुरुषांच्या नावाचा आधार घ्यावा लागतोय. छत्रपती शिवाजी महाराज असो, राजश्री शाहू महाराज असो, राष्ट्रपिता महात्मा गांधी असोत की घटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर असोत या राष्ट्रपुरुषांच्या नावाचा आधार घेतल्याशिवाय, राजकीय पक्षांची दुकाने चालत नाहीत हे आता सिद्ध झालंय. परंतु ज्या राष्ट्रपुरुषांच्या नावाचा आधार घेऊन तुम्ही आपली राजकीय दुकाने चालवत आहात, त्या पुरुषांच्या स्मृती जपताना, त्यांची स्मारके उभी करताना किमान त्यात तरी भ्रष्टाचार करू नका. छत्रपती शिवाजी महाराजांचे समुद्रात स्मारक उभे करण्याच्या प्रक्रियेला जवळपास चार वर्षे उलटून गेली, तरी अजून स्मारक तयार झालेले नाही. मग अवघ्या आठ महिन्यात राजकोटमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कसा तयार झाला? याचेच लोकांना आश्चर्य वाटते. हा पुतळा तयार करणारा जयदीप आपटे हा संघ परिवारातला आहे आणि केवळ त्या पुतळ्याचे अनावरण मोदींच्या हस्ते व्हावे म्हणून, अवघ्या आठ महिन्यात पुतळा तयार करण्यात आला. बरं तो ही अशा माणसाकडून की ज्याने आतापर्यंत कधीही असे मोठे पुतळे बनवलेले नाहीत. केवळ अर्धे पुतळे बनवले होते. जयदेव आपटे हा काही मोठा नामांकित शिल्पकार नाही. मग अशा माणसाला छत्रपती शिवाजी सारख्या महापुरुषांच्या पुतळ्याचे काम कसे काय आणि कोणी दिले? आणि यात किती कोटींचा भ्रष्टाचार झाला? हे महाराष्ट्रातल्या जनतेला कळायला हवं. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सांगतात म्हणे पुतळा हवेने पडला. आता काय म्हणाव या माणसाला? १३ कोटी जनतेचा हा प्रमुख प्रतिनिधी अशा पद्धतीची बालिश विधाने करून आपण राजकारणी नव्हे तर रिक्षावालेच आहोत. हे लोकांना स्वतःहून दाखवून देतोय. कमाल झाली या माणसाची. जर अशी ४५ किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामध्ये झाडे सुद्धा कोसळत नाहीत, मग एवढा भर भक्कम पुतळा कोसळला कसा? आता याची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र ही चौकशी करीत असताना जयदेव आपटे ला वाचवण्याचे प्रयत्न सुद्धा चौकशी बरोबर सुरू झाले असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे जयदेव आपटे हा जो कोणी शिल्पकार आहे त्याच्यावर कारवाई होईल असे वाटत नाही. कारण मुख्यमंत्र्यांनी सांगितलं पुतळा हवेने पडला आणि जर पुतळा हवेने पडला असेल तर तो हवेने पडण्या इतका कमकुवत का बनवन्यात आला? याचे उत्तर मुख्यमंत्री का देत नाहीत? एवढी लबाडी महाराष्ट्राच्या राजकारणात आत्तापर्यंत कधीही कुणी केलेली नव्हती. अर्थात हे सरकार कशा पद्धतीने सत्तेवर आले आहे हे सर्व लोकांना ठाऊक आहे. त्यामुळे त्यांच्याकडून फारशी अपेक्षा नाही. परंतु राष्ट्रपुरुषांच्या नावाने राजकारण करताना थोडी तरी लाज लज्जा बाळगणे आवश्यक होते. पुतळा पडल्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी किंवा पंतप्रधान मोदींनी माफी मागितली हे काही त्यांनी फार मोठे उपकार केले नाहीत .ही त्यांची जबाबदारी होती. कारण मोदींच्या हस्ते त्या पुतळ्याची पायाभरणी झाली होती. आणि त्यानंतर घाईघाईने आठ महिन्यात तो पुतळा एका अकुशल शिल्पकाराकडून बनवून घेण्यात आला. त्या मागचं एकच कारण होतं की मोदींच्या हस्ते त्या पुतळ्याचं अनावरण व्हावं .आणि त्याचे संपूर्ण श्रेय मोदी आणि भाजपाला मिळाव. म्हणजे भाजपाच्या घाणेरड्या राजकारणासाठी महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा जो बळी देण्यात आला, त्याला कदापी माफी नाही. महाराज तुमच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करून तुमची आणि तुमच्या महान कर्तुत्वाची थट्टा करणाऱ्या या हरामखोर राज्यकर्त्यांना अजिबात माफ करू नका. त्याना तुमचे नाव घेण्याचाही अधिकार नाही. केवळ माफी मागितली म्हणून ते या पापातून सुटले असे नाही. केवळ आणि केवळ मोदींची खुशामत करण्यासाठी मोदींची चमचेगिरी करण्यासाठी, संपूर्ण राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति असलेला महाराष्ट्राचा स्वाभिमान पणाला लावला आणि त्यामुळेच पुतळा कोसळण्याची ही भयंकर दुर्घटना घडली. पहिली गोष्ट म्हणजे राष्ट्रपुरुषांचे असे पुतळे उभारण्यापेक्षा त्यांच्या कर्तृत्वाची माहिती प्रत्येक पिढीला समजेल, अशा प्रकारची त्यांची स्मृती स्मारके उभी करायला हवीत. पण तसे केले तर त्या महान पुरुषांचे विचार लोकांच्या मनावर रुजतील आणि मग राजकारणात असलेले चोर चंडाळ यांच्याकडे लोक ढुंकूनी पाहणार नाहीत किंवा त्यांना जोड्याजवळ ही उभे करणार नाहीत, अशी परिस्थिती निर्माण होईल. म्हणून राष्ट्रपुरुषांचे विचार लोकांपर्यंत पोहोचणारच नाहीत यासाठी सर्वच राजकीय पक्षांकडून केवळ राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांची निर्मिती केली जाते. मात्र त्यांच्या विचाराकडे पाठ फिरवली जाते. त्यांचे विचार पायदळी तुडवले जातात. पण त्यांचे पुतळे मात्र उभे केले जात आहेत. त्यामुळे पुतळ्यांच्या या राजकारणात समाजाचां बळी जाण्याचा धोका निर्माण झालेला आहे. वास्तविक केंद्रात आणि महाराष्ट्रात २०१४ पासून एनडीए आघाडीचे सरकार आहे. या सरकारने जर मनावर घेतले असतं तर महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे जे काही गड किल्ले आहेत त्या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करण्यात आले असते. सध्या किल्ल्यांची जबाबदारी पुरातत्व विभागाकडे आहे आणि हा विभाग केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे पुरातत्त्व विभागाच्या परवानगीशिवाय राज्य सरकार महाराजांच्या गड किल्ल्यांचे संवर्धन करू शकत नाही. मग केंद्र सरकारने याबाबत कधी विचार केला होता का? पुरातत्त्व विभागाकडून किल्ल्याची जबाबदारी काढून घेऊन हे राज्य शासनाकडे सोपवायची आणि राज्य सरकार मार्फत केंद्राच्या मदतीने महाराजांच्या गड किल्ल्याचे संवर्धन करायचे असा प्रयत्न व्हायला हवा होता. परंतु अजून तरी तसेच झालेले नाही. त्यामुळे महाराजांच्या शौर्याचे प्रतीक असलेल्या या गड किल्ल्यांकडे लक्ष द्यायचं सोडून, पुतळे कसले बांधता? छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्ले इतिहास पुतळ्यांमध्ये नाही तर गड किल्ल्यांमधील मातीत आहे. ही गोष्ट केंद्रातील आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांनी समजून घेणे आवश्यक होते. परंतु अजून पर्यत तरी असे झालेले नाही. सरकार कॉंग्रेसचे असो किंवा भाजपाचे असो, त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांशी काहीही घेणेदेणे नाही .त्याना छत्रपती शिवाजी महाराज केवळ मतांसाठी हवे आहेत. निवडणुकीत किंवा इतर वेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा केवळ बाजार मांडायचा व त्यातून मतांची बेगमी करायची हेच इथल्या राजकीय पुढाऱ्यांना ठाऊक आहे. म्हणूनच २०२४ची विधानसभा निवडणूक तोंडावर आलेली असतानाच हा पुतळ्याचा घाट घालण्यात आला. आणि त्या पुतळ्याचे मोदींच्या हस्ते उद्घाटन व्हावं म्हणून अवघ्या आठ महिन्यात पुतळा उभारण्यात आला. ही अत्यंत गंभीर बाब असून ज्याने कोणी हे पाप केलेले आहे त्यांना शिवप्रेमींनी आणि महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेने माफ करू नये. त्यांच्या मापाचे पाप विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पदरात घालावे आणि राष्ट्रपुरुषांची अशा पद्धतीने चेष्टा करण्याचे काय परिणाम होऊ शकतात हे त्यांना दाखवून द्यावे. तरच त्यांना त्यांची लायकी कळेल.

# वाढवण बंदर असणार जगातील १० मोठ्या बंदरापैकी एक!

पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे बंदराच्या उभारणीसाठी ७६ हजार २०० कोटी रु. खर्चाच्या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली. महाराष्ट्रात वाढवण बंदर उभारणी करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. राज्याच्या विकासासाठी ही अत्यंत महत्त्वाची घटना असून त्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे क्रीडा, युवक कल्याण व बंदरे विकास मंत्री संजय बनसोडे यांनी आभार मानले आहेत. जगातील १० मोठ्या बंदरापैकी वाढवण हे एक मोठे बंदर असणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यात मोठ्याप्रमावर आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशी सुमारे १२ लाख रोजगार निर्मिती होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. बंदराकरिता रस्ते व रेल्वे जोडणी उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाच्या भूसंपादनामुळे कोणत्याही गावाचे स्थलांतर करण्याचे नियोजित नाही. तसेच, प्रस्तावित बंदरामुळे मासेमारीवर होणाऱ्या परिणामांचा सेंट्रल मरीन फिशरीज् रिसर्च इन्स्टिट्यूट (उचत्रछख) या केंद्र शासनाच्या संस्थेकडून अभ्यास करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने, प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांशी सल्लामसलत करुन मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

**स्थानिक नागरिकांच्या आर्थिक विकासाचे नवीन दालन खुले होणार**

वाढवण परिसरातील स्थानिक मत्स्यव्यवसाय करणाऱ्या व या व्यवसायाशी संबंधीत सर्व घटकांचे पुनर्वसन तसेच त्यांना योग्य तो मोबदला देण्यात येणार आहे. कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येऊन रोजगाराच्या नव-नवीन संधी निर्माण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे. वाढवण बंदरामुळे राज्याला तसेच स्थानिक नागरिकांना आर्थिक विकासाचे नवीन दालन खुले होणार आहे.

**केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ७४ व २६ टक्के**

वाढवण बंदर हे जे.एन.पी.टी. व महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या संयुक्त भागीदारीतून होणार आहे. या बंदर प्रकल्पाची किंमत ७६,२०० कोटी रुपये इतकी आहे. यामध्ये केंद्र आणिराज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ७४ व २६ टक्के असा असणार आहे. लवकरात लवकर बंदराची उभारणीस सुरुवात होणार आहे.

**वाढवण बंदराची आवश्यकता**

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे (जेएनपीए) विस्तारीकरण होऊन, न्हावा शेवा बंदरातील पद्धतींमधील कार्यक्षमता वाढवली तरी त्या बंदरात सध्या हाताळणी होणाऱ्या सुमारे साडेसहा दशलक्ष कंटेनर (ट्वेंटी फीट इक्विव्हॅलन्ट युनिट : 'टीईयू')चे प्रमाण १० दशलक्ष टीईयूपर्यतच पोहोचू शकेल. अशा स्थितीत देशातील निर्यात व आयात क्षेत्रात होणारी वाढ पाहता भविष्याच्या दृष्टिकोनातून जवळपास दुसऱ्या बंदराची उभारणी आवश्यक ठरली.

**वाढवणची नैसर्गिक खोली बंदरासाठी अनुकूलता**

जेएनपीए येथे सध्या १५ मीटरची खोली प्राप्त असून त्या ठिकाणी १७ हजार कंटेनर (टीईयू) क्षमता असणाऱ्या जहाजांची नांगरणी शक्य होणार आहे. वाढवण येथे १८ ते २० मीटरची नैसर्गिक खोली प्राप्त असून २४ हटेन क्षमतेपेक्षा अधिक जहाजांची बंदर, ७/१२ शक्य होईल; त्यामुळे भारताचे सिंगापूर, कोलंबो व इतर आंतरराष्ट्रीय बंदरांवरील अवलंबित्व संपुष्टात येईल. शिवाय वाढवण हे



'इंडियन मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर' व 'इंटरनॅशनल नॉर्थ साऊथ ट्रान्सपोर्टेशन कॉरिडॉर' या आंतरराष्ट्रीय नौकानयन मार्गालगत असल्याने आयात निर्यातीसाठी सोयीचे ठिकाण ठरेल.

**वाढवण बंदर खर्च**

भूसंपादनाच्या घटकासह एकूण प्रकल्पाची किंमत ७६,२२० कोटी रुपये आहे. यामध्ये पीपीपी नुसार मुख्य पायाभूत सुविधा, टर्मिनल आणि इतर व्यावसायिक पायाभूत सुविधांचा समावेश असेल. बंदराच्या पायाभूत सुविधांमध्ये प्रत्येकी १००० मीटर लांबीचे ९ कंटेनर टर्मिनल, ४ बहुउद्देशीय बर्थ, ४ लिक्विड कार्गो बर्थ, एक रो- रो बर्थ, एक कोस्टल कार्गो बर्थ आणि एक कोस्ट गार्ड बर्थ यांचा समावेश आहे. या प्रकल्पामध्ये ऑफशोअर क्षेत्रात १,४४८ हेक्टर क्षेत्र पुनर्सचयित करणे आणि १०.१४ किमी ब्रेकवॉटर, कंटेनर/कार्गो स्टोरेज क्षेत्रांचे बांधकाम समाविष्ट आहे. मंत्रिमंडळाने बंदर आणि राष्ट्रीय महामार्गादरम्यान एमओआरटीएचद्वारे रस्ते कनेक्टिव्हिटी स्थापित करण्यास आणि विद्यमान रेल्वे नेटवर्कशी रेल्वे जोडणी आणि एमओआरद्वारे आगामी समर्पित रेल फ्रेट कॉरिडॉरला मंजुरी दिली आहे.

**शाश्वत सागरी क्षेत्राला प्रोत्साहन**

भारताची व्यापार धोरणे आणि सागरी वाहतूक क्षेत्रातील घडामोडींमुळे देशात कंटेनरीकरणाची उच्च वाढ झाली आहे. ग्लोबल मेरिटाइम इंडिया समिट दरम्यान लॉन्च करण्यात आलेल्या सर्वसमावेशक रोडमॅपसह भारताचे सागरी क्षेत्र बदलणार आहे. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने तयार केलेले अमृत काल व्हिजन २०४७, मेरीटाइम इंडिया व्हिजन २०३० वर तयार केले आहे आणि जागतिक दर्जाची बंदरे विकसित करणे आणि अंतर्देशीय जलवाहतूक, किनारपट्टी शिपिंग आणि शाश्वत सागरी क्षेत्राला प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट आहे. पश्चिम किनाऱ्यावरील तीन प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांची क्षमता २०२९ पर्यत पूर्णतः वापरली जाईल आणि क्षमता २४ दशलक्ष ढएण च्या मर्यादेपर्यंत आवश्यक असून ही क्षमता वाढवण बंदरातून पूर्ण करणे अपेक्षित आहे.

**वाढवण बंदराच्या विकासामुळे भारत जगातील टॉप १० कंटेनर बंदरांपैकी एक**

वाधवन येथील प्रस्तावित सखोल मसुदा सर्व-हवामान प्रमुख बंदर राष्ट्रीय कंटेनर हाताळणी क्षमतेत २३.२ दशलक्ष TEUs ने वाढ करेल आणि २४,००० TEU वाहून नेण्यास सक्षम असलेल्या मेगा आकाराच्या कंटेनर जहाजांना कॉल करण्याची सुविधा देईल. वाढवण बंदराच्या विकासामुळे भारत जगातील टॉप १० कंटेनर बंदरांपैकी एक होईल. तयार केलेली क्षमता IMEC (इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर) आणि INSTC (इंटरनॅशनल नॉर्थ साउथ ट्रान्सपोर्टेशन कॉरिडॉर) द्वारे EXIM व्यापार प्रवाहाला देखील मदत करेल. सुदूर पूर्व, युरोप, मध्य-पूर्व, आफ्रिका दरम्यान आंतरराष्ट्रीय शिपिंग लेनवर चालणाऱ्या मेनलाइन मेगा जहाजे हाताळण्यास सक्षम अत्याधुनिक टर्मिनल सुविधा निर्माण करण्यासाठी जागतिक दर्जाच्या सागरी टर्मिनल सुविधा, सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) ला प्रोत्साहन देणे, कार्यक्षमता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेणे सुकर होणार आहे.

**ग्रीन पोर्ट उपक्रम**

या प्रकल्पाच्या केंद्रस्थानी पर्यावरणीय कारभारीपणाची बांधिलकी आहे. वाढवण बंदराच्या विकासाची कल्पना ग्रीनफिल्ड उपक्रम म्हणून करण्यात आली आहे, ज्यामध्ये शाश्वत पद्धती आणि स्थानिक परिसंस्थांना कमीत कमी व्यत्यय येण्यावर भर देण्यात आला आहे. वाढवण येथील प्रस्तावित बंदराचे उद्दिष्ट अक्षय ऊर्जेचा अवलंब करण्यापासून ते जहाजांसाठी किनाऱ्यावरील उर्जासारख्या कार्यक्षम बंदर ऑपरेशन्सपर्यंत शाश्वत उपायांचा समावेश करणे आणि बंदर परिसंस्थेमध्ये फक्त इलेक्ट्रिकल किंवा ग्रीन इंधन वाहतूक वाहनांना परवानगी दिली जाईल. हरित उपक्रम आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा स्वीकार करून, VPPL एक शाश्वत आणि समृद्ध भविष्याची सुरुवात करून, शून्य उत्सर्जन बंदर बनून भारतातील बंदर विकासासाठी नवीन बेंचमार्क सेट करण्याची आकांक्षा बाळगते. प्रकल्प विकासामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि टर्मिनलचे बांधकाम आणि कार्यान्वित करताना स्थानिक तरुणांना कौशल्य निर्माण करण्यात मदत होईल आणि ज्या मच्छीमारांच्या जीवनमानावर विपरित परिणाम होईल त्यांना राज्य सरकारच्या धोरणांनुसार भरपाई दिली जाईल. या प्रकल्पामुळे पुढील आर्थिक क्रियाकलापांमध्ये भर पडेल आणि १०,००,००० हून अधिक व्यक्तींना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. वाढवण बंदराच्या धोरणात्मक स्थानामुळे कंटेनर वाहतुकीची सोय होईल. हे बंदर आंतरराष्ट्रीय आणि भारतीय किनारपट्टीवर पूल करेल ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थांना गती मिळेल आणि कमी होईल. याशिवाय, वापी, इंदूर, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील उद्योगांच्या EXIM गरजा पूर्ण करणार आहेत. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जनेपप्रा) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. २६ मे १९८९ रोजी स्थापन झाल्यापासून, 'जनेपप्रा' ने बल्क कार्गो टर्मिनलमधून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतर केले आहे. अशा प्रकारे, 'जनेपप्रा'च्या समृद्ध अनुभवाचा फायदा घेत, भारत सरकारने प्रकल्पाच्या अंमलबजावणीची जबाबदारी जनेपप्रा वर सोपवली आहे. सध्या, 'जनेपप्रा' पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते एनएसएफटी (NSFT), एनएसआयसीटी (NSICT), एनएसआयजीटी (NSIGT), बीएमसीटी (BMCT) आणि एपीएमटी (PMT) बंदरात सामान्य मालवाहतुकीसाठी उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जेएनपीटीए पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल-आयओसीएल कन्सोर्टियमद्वारे व्यवस्थापित केले जाते. याव्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवण्यास सुलभ करतो. २७७ हेक्टर जमिनीवर वसलेले, JNP भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजीपूर्वक डिझाइन केलेले बहु-उत्पादन सेफ (SEZ) देखील चालवते.

**- राजू धोत्रे, विभागीय संपूर्ण अधिकारी**

# ग्रामीण भागाचा कायापालट करणारी महात्मा गांधी रोजगार हमी योजना

ग्रामीण भागातील नागरिकांच्या हाताला काम देणे आणि त्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या दुहेरी उद्देशाने राज्यात 'महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना' राबविण्यात येते. या योजनेच्या माध्यमातून गावा गावातील सार्वजनिक विकासाची विविध कामे हाती घेतली जातात. तसेच शेतकऱ्यांना लाभ होणाऱ्या अनेक योजना या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राबवल्या जात आहेत. त्यामुळे या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट होत असल्याचे चित्र दिसते आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये १९ लाख ५० हजार कुटुंबातील ३२ लाख ५० हजार मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच योजनेंतर्गत ७०० लाख मनुष्यदिवसांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये महिलांचा ४४ टक्के इतका वाटा आहे. आतापर्यंत २ हजार ९६३ कोटी इतका खर्च या योजनेत झाला असून त्यापैकी १ हजार ८५० कोटी इतका खर्च अकुशल मजुरीवर झाला आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमीनीवर अमृत महोत्सवी फळझाड लागवड, फुलपीक लागवड कार्यक्रम राबवण्यात येतो. या कार्यक्रमात अल्प भूधारक शेतकऱ्यांचा समावेश आहे. या कार्यक्रमात पूर्वी समाविष्ट असलेल्या आंबा, काजू, नारळ, पेरू, डाळींब, संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, सिताफळ, आवळा, चिंच, जांभूळ, फणस, कोकम, अंजिर, चिकू या फळझाडांसोबतच केळी, ड्रॅगनफ्रुट, व्हॅक्डो, द्राक्ष या फळझाडांचा आणि सोनचाफा फुलझाडे तसेच लवंग, दालचिनी, मिरी आणि जायफळ या मसाला पिकांचाही समावेश करण्यात आला आहे. फळबाग लागवडीचा कार्यक्रम राबवण्यात येत असलेल्या अडचणींचा विचार करून क्षेत्रीय स्तरावर योजना प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच लाभार्थ्यांना ऑनलाईन मागणी करण्याची सुविधा दिल्यामुळे योजना पारदर्शकपणे राबवण्यात येत आहे. मनरेगा अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना सिंचन विहरींचा लाभ देण्यात येतो. सिंचन विहिरीच्या खर्चाची मर्यादा ४ लाख रुपयापर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच किमान १५० मीटरची अट रद्द केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना याचा लाभ झाला आहे. नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. तसेच मनरेगा अंतर्गत आता कांदा चाळ निर्मितीसही मान्यता देण्यात आली आहे. शाळांच्या सुरक्षेचा विचार करता शाळांना संरक्षण भिंत असणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने शाळांना सुरक्षा भिंत बांधण्याचे काम मनरेगा अंतर्गत घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. मनरेगा अंतर्गत राज्यात मिशन बांबू लागवड कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यामध्ये राज्यात १० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवड करण्याचे उद्दीष्ट ठरवण्यात आले आहे. तसेच यासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी ७ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान देण्यात येते. पर्यावरण संरक्षणासोबतच शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुरधारण्यात या मिशन बांबूमुळे हातभार लागणार आहे. मनरेगा अंतर्गत मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना राबवण्यात येत आहे. या योजनेमध्ये प्रती किलोमीटर लांबीचा रस्ता मातीकामासह खडीकरणासाठी १५ लाख रुपयांचा निधी तसेच फक्त डांबरीकरणासाठी १३ लाख




रुपयांचा निधी दिला जातो. या कामांसाठी अकुशल मजुरीवरील खर्च किमान ३ लाख रुपये व कुशल म्हणजेच साहित्यावरील २ लाख रुपये असा एकूण ५ लाख रुपये खर्च मनरेगा अंतर्गत करणे बंधनकारक आहे. राज्यात मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत ५० हजार किलोमीटर लांबीचे रस्ते तयार करण्यात येत आहेत. भूमिगत पाण्याची पातळी उंचावण्याची गरज लक्षात घेऊन केंद्र शासन पुरस्कृत जनशक्ती अभियान कार्यक्रमांतर्गत 'कॅच द रेन' मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी लागणारे शोष खड्डे निर्मितीसह इतर जलसंधारणाची कामे मनरेगा अंतर्गत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईवर उपाययोजना म्हणून गायरान, वैयक्तिक जमिनीवर मनरेगा अंतर्गत चारा पिकांची लागवड करण्यात येते. एकूणच राज्याच्या ग्रामीण भागाचा विकास करणे आणि शेतकऱ्यांना शाश्वत आर्थिक स्त्रोत निर्माण करून देण्याच्या विविध योजना मनरेगा अंतर्गत राबवण्यात येत असून या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट होत आहे. गेल्या दोन वर्षात मनरेगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण, शेत, पाणंद रस्त्यांची निर्मिती झाली आहे. त्याशिवाय सिंचन विहिरी, फळबाग लावगड या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक स्थिरता मिळवून देण्यात आली आहे. मिशन बांबू लागवडीच्या माध्यमातून शेती क्षेत्रात क्रांती होणार आहे. शेतीची कामे नसणाऱ्या काळात शेतकऱ्यांच्या हाताला काम देऊन त्यांना उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करण्याचे काम महात्मा गांधी रोजगार हमी योजना ग्रामीणच्या माध्यमातून होत आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

02 TO 08 SEPTEMBER 2024 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 8/31/2024 8:29 PM Page 1



# मिरज येथील कुख्यात आरोपीला पिस्टलसह जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ते विजयपूर महामार्गावरील १३ मे येथून मिरज येथील कुख्यात आरोपीस क्रिस्टलसह सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोलापूर ग्रामीण जिल्हयाचा पदभार स्विकारल्या नंतर आगामी विधानसभा निवडणुकाच्या अनुषगाने स्थानिक गुन्हे शाखेकडील सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची बैठक घेवुन त्यांना माला विषयी व शरीरा विषयी गुन्हे करणाऱ्या आरोपीतांवर योग्य ती प्रतिबंध कारवाई करून गुन्हे नियंत्रण आणणेबाबत वरीष्ठ पोलीस निरीक्षक, सुरेश निंबाळकर यांना सुचना देवुन आदेशीत केले होते. त्यावरून सुरेश निंबाळकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुन्हे प्रतिबंध व प्रकटीकरणकामी मार्गदर्शन व सुचना दिले होते.

पोलीस उप-निरीक्षक, सुरज निंबाळकर व त्यांचे पथक सोलापूर तालुका पोलीस ठाणे आवारातील स्थानिक गुन्हे शाखा, कार्यालयात हजर असताना पोहेकॉ ४२५ विजयकुमार भरले यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, इसम नामे राहुल माने रा. मिरज, जि. सांगली हा अंगात गजगा-निळया रंगाचा हाफ टि शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्ट घालुन सोलापूर ते विजयपुर या महामार्गावर असलेल्या तेरामैल येथील ब्रिज खाली एक देशी बनावटीचे पिस्टल व राउंड सोबत बाळगुन उभा असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. पोउपनि सुरज निंबाळकर यांनी लागलीच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांना सदर बातमी माहिती देवुन आदेशाप्रमाणे पोउपनि सुरज निंबाळकर व त्यांचे पथक रवाना होवुन सोलापुर ते विजयपुर हायवे वर असलेल्या तेरा मैल ब्रीज जवळ असणाऱ्या सर्व्हीस रोड वर बातमीत नमूद वर्णनाप्रमाणे इसम दिसून आल्याने त्यास लागलीच गराडा घालून जागीच पकडले. सदर इसमास त्याचे नाव गाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव राहुल सतीश माने (वय ३१ वर्षे रा. वसंत हाउसिंग सोसायटी, माजी सैनिक वसाहत, ता. मिरज जि. सांगली) असे असल्याचे सांगितले. नमुद इसमाची तपासणी केली असता त्याच्या कंबरेला मागील बाजूस पॅन्टीत खोचलेला एक देशी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह मिळून आला. त्यानंतर त्याचे खिसे तपासले असता त्याचे खिशात पिस्टलच्या २ जिवंत काडतुसे मिळुन आले. सदर आरोपी नामे राहुल सतीश माने याचे विरूध्द मंद्रुप पोलीस ठाणे गुरनं २९६/२०२४ भारतीय हत्यार अधिनियम १९५९चे कलम ३, व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास मंद्रुप पोलीस ठाणे करीत आहे. नमुद आरोपी याचे गुन्हे अभिलेख पाहता यापुर्वी त्याचेवर सांगली जिल्हयात मिरज शहर, महात्मा गांधी, एमआयडीसी, चिंचणीवांगी, भिलवडी या पोलीस ठाणेमध्ये दरोडा, एनडीपीएस अ‍ॅक्ट, आर्म अ‍ॅक्ट, चोरी, घरफोडी या सारखे तसेच ब्यातरायणपुरा पो.ठाणे बेंगलोर राज्य कर्नाटक येथे आर्म अ‍ॅक्टचा गुन्हा दाखल आहे. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर व स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक सुरज निंबाळकर व पथकातील ग्रेड पोउपनि राजेश गायकवाड, ग्रेडपोउपनि ख्वाजा मुजावर, पोहेकॉ परशुराम शिंदे, सलीम बागवान, विजयकुमार भरले, पोकॉ घोरपडे, समर्थ गाजरे, चापोकॉ अशोक हलसंगी यांनी बजावली.

### महापालिकेच्या सर्व शाळेत सीसीटिव्ही बसविणार

# शालेय स्तरावर तक्रार पेटी, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षितता समिती स्थापन करणार -पालिका आयुक्त अजय वैद्य



**भिवंडी/प्रतिनिधी**

बदलापूर येथील मुली वरील अत्याचाराच्या घटने नंतर सर्व प्रशासन यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या आहेत. दरम्यान पालिका शाळेमध्ये शिक्षकाने केलेल्या विनयभंगाच्या प्रकरणाची पालिका आयुक्त यांनी गंभीर दखल घेत शिक्षकाचे निलंबन करीत पालिकेतील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सर्व मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख यांची तात्काळ बैठक घेवून पालिकेच्या व अन्य कोणत्याही शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांची कोणत्याही प्रकारे छेडछाड, त्यांना कोणत्याही प्रकारे असा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी योग्य त्या सूचना आयुक्त अजय वैद्य यांनी दिल्या. शाळांमध्ये सि.सि.टीव्ही लावणे, त्यांची सातत्याने तपासणी करणे, पोलीस विभागाकडून सर्व शाळांची गोपनीय तपासणी करणार, शाळेतील मुलांना चांगला स्पर्श, वाईट स्पर्श, महिला व विद्यार्थीनी यांच्याकडे बघून चुकीचे हावभाव, चुकीचे हातवारे करणे यावर लक्ष ठेवा असे सांगत सर्व शाळेत तक्रार पेटी ठेवावी. तक्रार पेटींची दखल तात्काळ घ्यावी, शाळेत सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षितता समिती स्थापन करा अशा सुचना पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी सर्व पालिका शाळेतील मुख्याध्यापक, केंद्र शिक्षक यांना दिल्या आहेत. महिला शिक्षीका यांनी मुलींना विश्वासात घेऊन संवाद साधावा. त्यांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श याची कल्पना द्यावी. आपल्या शाळेत नागरिक पालक गरीब घरातील असल्याने पालिकेच्या शाळेत मुलांना अत्यंत विश्वासाने पाठवतात त्या सर्व मुंलाची काळजी घेणे आवश्यक आहे. शाळेतील विद्यार्थी वर्गाला कोणत्याही प्रकारे मानसिक व शारीरीक त्रास होणार नाही याची दक्षता सर्वानी घ्यावी असे आवाहन शेवटी अजय वैद्य यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दुर्घटनेनंतर भिवंडीत निषेध आंदोलन




**भिवंडी/प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा अवघ्या काही महिन्यातच कोसळून झालेल्या दुर्घटनेचे तीव्र पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटत आहेत. गुरुवारी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महाराष्ट्र भर निषेध आंदोलन केले जात आहे. खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या नेतृत्वा खाली भिवंडीत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्या नंतर सरकारच्या विरोधात निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या.

या आंदोलनात तालुकाध्यक्ष गणेश गुळवी, महिला जिल्हाध्यक्षा डॉ.रुपाली कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष महेंद्र पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हा ग्रामीण अध्यक्ष मुकेश पाटील, पंचायत समिती माजी सभापती विकास भोईर यांसह मोठ्या संख्येने राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा घाईघाईने उभारण्यात आलेला पुतळ्याचे मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करून त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला गेला. आणि म्हणूनच ही दुर्घटना घडली असून हा पुतळा उभारताना कोणती ही खबरदारी घेतली नाही, तपासणी केली नाही त्यामुळेच ही दुर्घटना घडली असून या दुर्घटने मुळे महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेलेली आहे अशी टीका खासदार बाळ्या मामा म्हात्रे यांनी करीत या दुर्घटनेमध्ये दोषी असलेल्यांवर तात्काळ कारवाई करून त्या ठिकाणी यथोचित असे स्मारक छत्रपती शिवाजी महाराज यांचे उभारले गेले पाहिजे असे सांगत, एकमेकांवर जबाबदारी न ढकलता शासनाने सर्वप्रथम या दुर्घटनेबद्दल महाराष्ट्राची माफी मागावी अशी मागणी खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी केली आहे.

# भारतीय जनता पक्षाच्या जनसंवाद यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहमदपूर/फिरोज शेख**

भारतीय जनता पक्ष महायुतीच्या सरकारनी गेल्या अडीच वर्षात जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवून समाजातील सर्व घटकांना न्याय दिला असल्याने भारतीय जनता पक्षाच्या वतीने अहमदपूर विधानसभा मतदारसंघात जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून जनजागरण करण्यात आले. दि. २७ आगस्ट रोजी सकाळी ७ वाजता अहमदपूर शहरातील शीप्र गणेश मंदीरात पुजा व दर्शन करून जनसंवाद यात्रेला सुरुवात करण्यात आली. तदनंतर अहमदपूर तालुक्यातील काळेगाव, शेनकुड, सुमठाना, बेंबडेवाडी, वंजारवाडी, धसवाडी, खंडाळी, नागझरी, उजणा, उत्तर रुई, सांगवी, रुद्धा, हागदळ, गुगदळ, हागदळ, वरवटी, दक्षीन रुई, शिंदगी खु. अशा खंडाळी जिल्हा परिषद मतदारसंघातील प्रत्येक गावात ही जनसंवाद यात्रा गेली असता जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद भारतीय जनता पक्षाच्या जनसंवाद यात्रेला मिळाला. भारतीय जनता पक्षाचे सर्व नेते व पदाधिकारी यांनी जनतेच्या गाठीभेटी घेऊन जनतेची संवाद साधला.जनसंवाद यात्रेचे व उपस्थित भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांचे गावोगावी ढोलताशांच्या गजरात फटाक्यांची आतिषबाजी करुन जल्लोषात स्वागत करण्यात आले. सदरील जनसंवाद यात्रेत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. भारत चामे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानोबा बडगिरे, तालुका अध्यक्ष प्रताप पाटील, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, जिल्हा चिटणीस हणमंत देवकते, प्रदेश सदस्य हेमंत गुट्टे, दत्ता जमालपुरे, तालुका सरचिटणीस माणिक नरवटे, महीला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा जयश्री केंद्रे, तालुका उपाध्यक्ष परमेश्र्वर पाटील, प्रफुल ढवळे, सरपंच संग्राम नरवटे यांच्या सह भारतीय जनता पक्षाचे नेते पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने जनसंवाद यात्रेत सहभागी झाले होते.

# १९ लाखांचा चोरीस गेलेला बल्कर वळसंग पोलिसांनी २४ तासात केले जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

२८ ऑगस्ट रोजी अपरात्री दीड वाजण्याच्या सुमारास अल्ट्राटेक कंपनीच्या कॉर्नरजवळ एका १९ लाख रूपयांचा बल्करला ४ अनोळखी इसमांनी दोन मोटारसायकल वरून थांबवून जबरीने बल्कर चोरून नेला होता. सदरबाबत बल्करचे चालक सत्यम माशाळे यांनी वळसंग पोलीस ठाणेत ४ इसमांविरूध्द गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याची दखल घेवून वळसंग पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी यांनी सदरची हकिकत मा. पोलीस अधीक्षक सो., सोलापूर ग्रामीण यांना कळविले त्यावर पोलीस अधीक्षक सो. यांनी सविस्तर सुचना दिल्या. सुचनांप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी अक्कलकोट यांचे मार्गदर्शनाखाली पथक नेमुन सदरचा बल्कर शोधण्यासाठी पथक तयार करून रवाना केले. सदरचा बल्करच्या शोधासाठी पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील यांनी साक्षीदार व संशयित इसमांकडे तपास केला. तसेच तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे शास्त्री



नगर, रायचुर राज्य कर्नाटक येथे जावून शोध घेवून बल्कर २४ तासाच्या आत जप्त केला आहे. सदर प्रकरणी आरोपी निष्पन्न करण्यात आलेले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील हे करीत आहेत. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकणी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय अधिकारी विलास यामावार यांचे मार्गदर्शनाखाली वळसंग पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले, पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील, पोना संतोष चव्हाण, पोकॉ शंकर पाटील यांनी केलेली आहे.

## वर्सोवा पुलावरून दाम्पत्याची उडी; पत्नीचा मृत्यू

**वसई/प्रतिनिधी**



मुंबई आमदाबाद महामार्गावरील वर्सोवा पुलावरून एका दाम्पत्याने उडी मारल्याची घटना घडली आहे. यात पतीला वाचवण्यात यश आले आहे. मात्र महिला खाडीत बुडाल्याने अग्निशमन विभागामार्फत बचाव कार्य राबविण्यात येत आहे. गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास ही घटना घडली. शशिकला यादव (२८) असे खाडीत बुडालेल्या महिलेचे नाव आहे. ती नायगावची रहिवासी आहे. तीन दिवसापूर्वीच उत्तर प्रदेश राज्यातून पती दिनेश यादवकडे आली होती. गुरुवारी सकाळी पती पत्नी मध्ये वाद झाल्यानंतर ती वर्सोवा पुलावर आत्महत्या करण्यासाठी गेली. यावेळी तिची समजूत काढण्यासाठी तिची मावशी देखील तिच्या मागे गेली. दरम्यान, पतीला येत असल्याचे पाहून शशिकलाने पुलावरून खाडीत उडी मारली. ते पाहून पती दिनेशने देखील उडी मारली. स्थानिकांनी दोरखंडाच्या मदतीने पतीला वाचवले. मात्र शशिकला पाण्यात वाहून गेली. अग्निशमन दलाच्या मदतीने तिचा शोध सुरू आहे. यादव दाम्पत्याला ३ महिन्यांचे तान्हे बाळ असून ३ वर्षांचा मुलगा आहे.

# नालासोपाऱ्यातील हाणामारी प्रकरणात ११ जणांना अटक

**नालासोपारा/प्रतिनिधी**



नालासोपाऱ्यात शुक्रवारी रात्री दोन गटात झालेल्या हाणामारी प्रकरणात एकूण ११ जणांना अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखा २ च्या पथकाने यातील ५ जणांना तर तुळींज पोलिसांनी ६ जणांना अटक केली आहे. या हाणामारीत एका तरुणाचा मृत्यू झाला होता, तर ४ जण जखमी झाले आहेत. शुक्रवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास नालासोपारा पूर्वेच्या संतोष भवन परिसरात क्षुल्लक वादातुन दोन गटात मारामारी झाली होती.

या मारहाणीत दिपक पाल याचा जागीच मृत्यू झाला आहे तर शुभम ठाकूर आणि सलीम यांच्यासह ४ जण गंभीर जखमी झाले आहेत. यातील दोघांना कांदिवली येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर (शताब्दी) रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर अन्य दोघांना वसईतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. या प्रकरणी तुळींज पोलिसांनी दोन्ही गटातील तरुणांविरोधात हत्या, आणि हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हे शाखा २ च्या पथकाचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे यांच्या पथकाने ५ जणांना अटक केले त्यामध्ये गणेश यादव, (२२) सौरभ शेख (२२) अल्ताफ सिद्दीकी, (२४) आमिर शेख (२४) यांचा समावेश आहे. तुळींज पोलिसांनीही साहिल लोखंडे (२०) शिवा राजभर (२४) यांच्यासह ६ जणांना अटक केली आहे.

# भिवंडीत पोलिस गणेशोत्सव स्पर्धेत धामणकर नाका मित्र मंडळाने पटकावला प्रथम क्रमांक!



**भिवंडी/प्रतिनिधी**

पोलिस आयुक्तालय ठाणे परिमंडळ दोन भिवंडी उपायुक्त क्षेत्रात आयोजित राष्ट्रीय एकात्मता व जातीय सलोखा सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत धामणकर नाका मित्र मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. अप्पर पोलीस आयुक्त विनायक देशमुख, उपायुक्त डॉ श्रीकांत परोपकारी यांच्या शुभहस्ते मंडळाचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांना फिरती ढाल, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष मदन भोई, सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक देशमुख, सचिन सांगळे आदी उपस्थित होते. तर कार्यक्रमास मोठ्या संख्येने गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी पोलिस अधिकारी उपस्थित होते. पोलिसांसोबत स्थानिक भिवंडीकर नागरिक यांच्या महत्त्वपूर्ण सहभागाने आज शांत शहर अशी नवी ओळख भिवंडी शहराची झाली आहे. या शहरात सर्वधर्मीय गुण्यागोविंदाने आपले सण उत्सव साजरे करीत असताना एकमेकांना सहकारी करीत आहेत. हे सहकार्य यापुढे ही अबाधित ठेवून सर्वानी पर्यावरणपूरक, आवाजाची व वेळेची मर्यादा सांभाळून गणेशोत्सव साजरा करावा अशा शुभेच्छा अप्पर पोलीस आयुक्त विनायक देशमुख यांनी दिल्या. या स्पर्धेत विशेष पारितोषिक स्व.पंडित नाना मित्र मंडळ, भारत कॉलनी कामतघर, द्वितीय पारितोषिक बाळ गोपाळ मित्र मंडळ, साई प्रसन्न सोसायटी, नारपोली, स्वामी समर्थ मित्र मंडळ, चौधरी कंपाऊंड, तृतीय मित्रमंडळ युवा मित्र मंडळ, खोणी, श्री गणेश मित्र मंडळ, न्हावी पाडा यांसह दहा उत्तेजनार्थ मंडळांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या दरम्यान परीक्षक मंडळातील सदस्य यांचा सुध्दा सन्मान करण्यात आला .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी राजे यांनी केले तर आभार प्रदर्शन सचिन सांगळे यांनी केले.

# मुंबई येथील विज्ञान प्रदर्शनात पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पटकावला द्वितीय क्रमांक



**भिवंडी/प्रतिनिधी**

मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्र,वरळी याठिकाणी लर्निंग लिंक्स फाउंडेशनद्वारे शेल एनएक्सप्लोर एटीएल सायन्स कार्निव्हल या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या ठिकाणी भिवंडीतील पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विज्ञान प्रकल्पास द्वितीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे. या विज्ञान कार्निव्हलमध्ये मुंबई, ठाणे, पालघर आणि नवी मुंबईतील एटीएल शाळांनी सहभाग घेत, विद्यार्थ्यांनी खाद्य, पाणी आणि ऊर्जा या समस्यांवर आधारित त्यांच्या सृजनशीलतेचे आणि प्रस्तुतीकरण कौशल्याचे प्रदर्शन केले होते. या स्पर्धेत पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालयाच्या पूर्वा जाधव आणि वैभवी लोटकर या विद्यार्थ्यांनी एमडीएम एटीएम हा भारतातील भुकेची समस्या सोडविण्यासाठी अत्यंत वास्तववादी आणि उपायकारक या विषयावर प्रकल्प बनवला होता. यासाठी विद्यार्थ्यांना एटीएल समन्वयक परेश मोरे व श्रीमती. ललिता पाटील यांनी मार्गदर्शन केले.

शाळेच्या व्यवस्थापनाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष विजय जाधव तसेच उपाध्यक्षा श्रीमती.अरुणा जाधव, शाळेचे मुख्याध्यापक सुधीर घागस व सर्व शिक्षकांनी या यशस्वी विद्यार्थ्याचे अभिनंदन करीत जल्लोषात स्वागत केले आहे. विजेत्यांना नेहरू विज्ञान केंद्राचे संचालक उमेशकुमार रस्तोगी, शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती मंजू यादव आणि नवी मुंबई महानगर पालिका शिक्षण विभाग समन्वयक भंडारी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. भाभा अटॉमिक रिसर्च सेंटरचे वैज्ञानिक अधिकारी सयाजी मेहेत्रे आणि पाटकर कॉलेज, प्राध्यापक प्रशांत कांबळे यांनी प्रकल्पांचे मूल्यांकन केले. शेल एनएक्सप्लोरर हा एक जागतिक कार्यक्रम असून जी २० देशां मध्ये चालवला जातो, ज्यामधून अनेक युवा नवकल्पकाराना लाभ होत आहे. शेल एनएक्सप्लोरचे वरिष्ठ व्यवस्थापक श्रीकांत राज आणि प्रमुख व्यवस्थापक साईराम पालेती यांनी या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित होते.

02 TO 08 SEPTEMBER 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 8/31/2024 8:30 PM Page 1



पान १ वरून....

## हत्या केल्याची फुशारकी मारणे अंगाशी...

बोलत होते. उमेश फाले याच्या घरची परिस्थीती तशी सधन होती. कशाचीच कमतरता नव्हती. उमेश याला दारू पिण्याचे व्यसन होते. तो सदा न कदा दारूच्या नशेत तर्र असायचा. त्यामुळे त्याचे त्याच्या पत्नीकडे दुर्लक्ष होत होते. नेमके याच संधीचा फायदा घेत राजाराम याने त्याच्या पत्नीशी सलगी वाढवली होती. काजुच्या बागेत कामाला असल्याने काही तरी कामाचे निमित्य काढून तो सारखा उमेशच्या घरी येत जात होता. हल्ली तर त्याचे येणे जाणे खूपच वाढले होते. तो उमेश हा घरी नसताना देखील त्याच्या घरी येऊन त्याच्या बायको बरोबर गुलगुल करीत बसत होता. ती ही त्याला लाईन देत होती त्यामुळे राजाराम याचे फावले होते. त्याला ही ती आवडत असल्याने कधी एकदा हिला अंगाखाली घेतो असे त्याला झाले होते. तो त्या संधीची वाटच पाहत होता. एकदा घरी कुणी नसताना त्याने तिला मिठीत घेऊन बेडवर आडवे केले. त्यावेळी त्याने तिला असे काही सुख दिले की, ती त्यावेळेपासून ती नवरा उमेश याला किमंत देत नव्हती. राजाराम आणि आपल्या बायकोचे तसले संबंध आहेत याची थोडीशी कल्पना उमेश याला आली असल्याने तो दारूच्या नशेत तो आपल्या बायकोबरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत होता. तो तिला सांगत होता राजारामचा नाद सोड त्याला घरात घेऊ नकोस परंतु त्याची बायको ही राजारामच्या इतकी आहरी गेली की, ती नवऱ्याला किमंतच देत नव्हती. त्यामुळे त्याचे सांगणे म्हणजे पालथ्या घडयावरचे पाणीच होते.आपली बायको आपले ऐकत नाही म्हणून उमेश हा राजाराम याला शिव्या देत होता. त्याच्याशी भांडण काढत होता. तो ही उमेश याला उलटे बोलून तुझी बायको तुझ्या ताब्यात नाही तु मला का दोष देतोस असे म्हणून उमेशला माझ्या वाटेला येऊ नकोस, माझ्या नादाला लागलास तर तुझे काही खरे नाही म्हणून धमकी देत होता. बायकोच्या अशा बाहेर ख्याली वागण्याने उमेश हा वैतागलेला होता. आता तर तो जास्तच दारू पिऊ लागला. जेथे जेथे राजाराम गवस भेटेल तेथे तेथे तु माझ्या घराकडे येत जाऊ नकोस माझ्या बायकोला नादाला लावू नकोस म्हणून त्याला शिव्या देत होता. त्याच्या शिव्या ऐकून राजाराम हा त्याचेवर चिडला होता. एकदा दोनदा तर त्याने उमेश याला मी तुझ्या बायकोला पळवूनच नेतो बघ म्हणून सांगितले. उमेशच्या वागण्याला त्याची बायको ही वैतगलेली होती. राजारामला ही उमेशचा राग येऊ लागला होता. काही करून उमेशचा काटा काढला पाहिजे असे त्याचे मत बनले. खरे तर राजाराम हा दारू पित नव्हता. परंतु उमेशचा काटा काढायचा तर उमेशला दारू पाजूनच संपवावे लागेल असा त्याने विचार केला. उमेश ला दारू पाजायचे तर पिणारे मित्रच पाहिजेत म्हणून त्याने आपले मित्र अनिकेत नाईक आणि सचिन बांदेकर याची निवड केली. ते दोघे ही उमेशचे मित्र होते.त्यांना ही राजाराम गवस आणि उमेश फाले याच्या बायकोचे लफडे माहित होते. म्हणून राजारामने सांगितल्यावर ते दोघे ही दारूसाठी आरि जेवणासाठी उमेशची गेम करायचे ठरविले. त्यासाठी त्यांनी राजारामला साथ देण्यास ही तयार झाले. सचिन बांदेकर याने दि.१८ मे २०२२ रोजी उमेश फाले याला दारू पिण्यासाठी येणार का?म्हणून विचारणा केली.अड्डल दारूडा असणाऱ्या उमेशला कुणी दारू प्यायला दिली तर तो पित होता.त्या दिवशी संध्याकाळी ६.३०च्या सुमारास घरातील लोकांन बाजारातून दूध घेऊन येतो म्हणून सांगून बाहेर पडला. अनिकेत नाईक आणि सचिन बांदेकर यांनी उमेश याला घेऊन दोडामार्ग व गोवा राज्याच्या सीमेवर असणाऱ्या तिलारी धरणाच्या कालव्याजवळ नेले. तेथे आधीच राजाराम गवस हा होता. उमेश हा दारूसाठी येणार हे त्याला ही माहित होते. ते तिघे जण दारू पित असताना राजाराम याने दारूच्या नशेत असणाऱ्या उमेशला तु मला शिव्या कशाला घालतोस,तुझ्या बायको बरोबर माझे संबंध आहेत तु काय करणार आहेस अशी विचारणा केली.याचा राग उमेशला आला. तो दारुच्या नशेत राजाराम याला घाणेरड्या शिव्या देऊ लागला. त्यावेळी अनिकेत नाईक आणि सचिन बांदेकर यांनी उमेश याला लाथाबुक्यांनी मारायला सुरूवात केली. दारूच्या नशेत असणाऱ्या अनिकेत याने उमेशचे हात पकडले तर सचिन नाईक याने त्याचे पाय पकडले.त्यावेळी राजाराम याने उमेशच्या गुप्तांगावर लाथा मारल्या. उमेशच्या गुप्तांगावर लाथा मारल्याने तो तळमळू लागला. त्याचवेळी राजाराम याने एका दोरीने उमेश याचा गळा जोरात आवळला. आणि त्याच्या डोक्यात एक मोंा दगड घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटले. त्यांनी ओरडण्याची ही संधी दिली नाही. त्याचा जागीच मृत्यु झाला. आता त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा त्यांनी विचार केला. त्यांनी त्याचा मृतदेह ओढत नेऊन तिलाणी धरणाच्या कालव्यात टाकला. काही झाले नसल्याच्या अविभार्वात त्यांनी तेथून काढता पाय घेतला. संध्याकाळी दूध आणायला गेलेला उमेश रात्री उशिरापर्यत घराकडे पर्यत आला नाही म्हणून त्याच्या घरचे लोक त्याचा शोध घेऊ लागले. परंतु त्याचा शोध कुठेच लागला नाही.दोन दिवस त्याचा कुठेच शोध लागला नाही म्हणून उमेशच्या चुलत्याने संतोष फाले यांनी दोडामार्ग पोलीस स्टेशला उमेश फाले हा बेपत्ता असल्याची फिर्याद नोंदविली. पोलीस ही त्याचा आपल्या परीने शोध घेत होते. परंतु त्याचा शोध काही शेवट लागला नाही. ही घटना घडून दोन वर्ष झाली तरी उमेश फाले याचा शोध लागला नाही. गेल्या आठ दिवसापूर्वी एका बारमध्ये अनिकेत नाईक हा दारू पित बसला असताना तो दारूच्या नशेत आपल्या मित्रासमोर मी आणि माझ्या दोन मित्रांनी मिळुन उमेश फाले याचा खून करून त्याचा मृतदेह तिलारी धरणाच्या कालव्यात टाकून दिल्याचे सांगून मी खून कसा पचवितो हे मोठया दिमाखात दारूच्या नशेत सांगत होता. नेमके तो सांगत असलेली घटना त्या बारमध्ये असणाऱ्या एका पोलीसांच्या खबऱ्याच्या कानापर्यंत गेली. त्या खबऱ्याने ही घटना दोडामार्ग पोलिसांना सांगितली. त्यावेळी पोलीसांनी खबऱ्याने सांगितलेल्या घटनेची खातरजमा करून अनिकेत नाईक याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्याला दोडामार्ग पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे उमेश फाले याच्या बेपत्ता होण्यामागे आणि खूनाविषयी विचारणा केली. सुरूवातीला तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. परंतु त्याला पोलीसी खाक्या दाखविल्यावर तो पोपटासारखा बोलला. त्याने आपण केलेल्या गुन्हयाची माहिती देऊन या गुन्हयात सामील असलेल्या सचिन बांदेकर आणि राजाराम गवस याची नावे सांगितले. त्याच्या सांगण्यावरून पोलिसांनी या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी राजाराम गवस याला व सचिन बांदेकर यांना ताब्यात घेतले. त्यांनी ही आपल्या गुन्हयाची कबुली दिली. त्यांनी आपल्या गुन्हयाची कबुली दिल्यावर पोलिसांनी या घटनेची लेखी फिर्याद मयत उमेश फाले याचा चुलता संतोष फाले (वय ४९) याच्याकडून फिर्याद घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी उमेश बाळू फाले (वय ३२) याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी मुख्य संशयीत आरोपी राजाराम उर्फ ओला काशीराम गवस (वय ३४), सचिन महादेव बांदेकर (वय ३२) आणि अनिकेत आनंदा नाईक (वय २५) रा.सर्वजण उसप याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी या सर्वाना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना २८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक निसर्ग ओतारी यांच्या मार्गदर्शनाखाली दीपक सुतार, रामचंद्र मळगावकर राजेंद्र पाटील, अनुपकुमार खंडे, प्रकाश कदम, अशिष गंगावणे, प्रमोद काळसेकर यांनी केला. विवाहबाहय संबंध टोकाला गेले की, त्यातून खूनासारखी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते. संशयाने मन पोखरले की नवऱ्याचे चित कशात लागत नाही. तो सारखा पत्नीवर संशय घेऊ लागतो आणि याच संशयातून मोठा अनर्थ घडतो.

## रक्ताचे नाते ‘चांगदेव’ याला नाही...

पुतण्यांनी ८० वर्षाच्या वृद्धाच्या अंगावर डिझेल टाकून पेटवून देत त्याचा क्रूरपणे खून केल्याची घटना घडली. निफाड तालुक्यातील थडी सारोळे गावातील नांदूरमध्यमेश्वर भागात कचेश्वर महादू नागरे हे वृद्ध पत्नी जिजाबाई हिच्यासोबत शेतात एकटेच रहात होते आणि शेतीचा व्यवसाय करून उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या शेताजवळच त्यांचा भाऊ चांगदेव महादू नागरे यांचे शेत आहे. या शेतात असलेल्या विहीरीवरून कचेश्वर यांचा चांगदेव व त्याची मुले यांच्याशी सतत वाद सुरू होता. गेल्या सात-आठ वर्षापासून कचेश्वर नागरे यांच्या शेतातील वडीलोपार्जीत विहीरीवरून त्यांच्यात वाद सुरू होता, त्यामुळे चांगदेव आणि त्याची मुले कचेश्वर नागरे यांना पाण्यात पहात होते. विहीरीवरून सतत ते कचेश्वर यांच्याशी भांडण करायचे आणि त्याला ठार मारण्याची सतत धमकी द्यायचे. वडीलोपार्जीत विहीरीतील पाणी घेवू देत नाही या कारणावरून चांगदेव हा भाऊ कचेश्वर याच्यावर दात-ओठ खात होता. त्याला त्याचा भयंकर राग आला होता, त्यामुळे मुलांशी चर्चा करून त्याने कचेश्वरला कायमचा धडा शिकवण्याचा निर्णय घेतला होता. मंगळवार दि. ९ जुलै २०२४ रोजी दुपारी कचेश्वर नागरे हे आपल्या शेतातील घराजवळ साफसफाईचे काम करत होते. ते एकटेच होते, तर त्यांच्याजवळच रहात असलेला एक मुलगा काही कामानिमित्ताने गावात गेला होता. कचेश्वर हे एकटेच घराजवळ साफसफाई करत असल्याचे पाहून दबा धरून बसलेला चांगदेव नागरे व त्याची दोन्ही मुले हलक्या पावलांनी कचेश्वर यांच्याजवळ आले. त्यांनी साफसफाईच्या कामात गुंग असलेल्या कचेश्वर यांच्या अंगावर सोबत आणलेले डिझेल ओतून त्यांना पेटवून दिले. अचानक ओढवलेल्या प्रसंगाने कचेश्वर गडबडले. काही समजण्याच्या आत त्यांना ज्वालांनी वेढले. आगीनेपेट घेतलेला होता. जीव वाचवण्यासाठी ते सैरभैर पळायला लागले. मोठमोठ्याने आरडाओरड करू लागले. त्यांचा आवाज ऐकून त्यांची पत्नी घराबाहेर आली, त्यांनीही मदतीसाठी आरडाओरड केली, पण कोणीही मदतीसाठी धावून आले नाही. दोघांनी मिळून कशीतरी आग शमवली, मात्र तोपर्यत कचेश्वर हे ९५ टक्के भाजून गंभीरपणे जखमी झाले. त्यांना जाळण्यासाठी आलेला चांगदेव नागरे व त्याची दोन्ही मुले तेथून पसार झाली. भाजून जखमी झालेल्या कचेश्वर यांना तातडीने नाशिक येथील जिल्हा रूग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले, मात्र ते ९५ टक्के भाजलेले असल्याने उपचार सुरू असतांना त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने गावात एकच खळबळ उडाली. कचेश्वर नागरे हे एकटेच शेतात रहात असल्याने या संधीचा फायदा घेवून त्यांचा सख्खा भाऊ चांगदेव नागरे वदोघा पुतण्यांनी त्यांच्या अंगावर डिझेल ओतून त्यांना पेटवून ठार मारले. वडीलोपार्जीत शेतातील विहीरीसाठी सख्खा भाऊ पक्का वैरी निघाला. त्याने भावाचा जीवच घेतला. निफाड पोलीस ठाण्यामध्ये हनुमान कचेश्वर नागरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चांगदेव महादेव नागरे व त्याची मुले रविंद्र व निलेश या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पाटील यांनी तपासाला सुरूवात केली. घटनास्थळ आणि मृतदेहाचा पंचनामा करून लगेच तिघा आरोपींचा शोध घेवून त्यांना अटक केली.

## शिष्यावर हात उचलणे महागात...

झाल्याने तो आपल्या आजी आत्या सोबत राहतो.त्याच्या घरची परिस्थीती तशी बेताची असल्याने शिक्षण पुर्ण करून त्याला आपले करियर घडवायचे होते. त्याला चांगल्या ठिकाणी नोकरी करायची होती. त्यासाठी तो धडपडत होता. तो शिक्षण घेत असताना यापूर्वी ही तो जिल्हा संघातून कबड्डी स्पर्धा खेळला असल्याने त्याचे जिल्हयात नाव झाले होते. कबड्डी चॅपियन असल्याने त्याला जीमची आवड होती. त्यासाठी तो चांगल्या जीममध्ये रोज व्यायाम करण्यासाठी जात होता. त्याला चांगले प्रशिक्षक म्हणून ही आपले नाव व्हावे असे वाटत होते. तो राहत असलेल्या ठिकाणाच्या एका मंडळाकडून ही तो कबड्डी खेळत होता. तसेच आपल्या भागातील नवीन मुलांना ही कबड्डीचे डाव शिकवित होता. त्याच्याकडे कबड्डी शिकायला येणारी मुले ही अल्पवयीन म्हणजे १५ ते १७ वयोगटातील होती. तसे तो त्यांना सिनियर होता. तो जे सांगले ते ती मुले करायची. परंतु हल्ली तो ज्या अल्पवयीन मुलांना कबड्डी शिकवित होता. त्यातील एक मुलगा त्याचे काहीच ऐकत नव्हता. अनिकेतने त्याला जर काही सांगितले तर तो त्याच्या विरूध्दच वागत होता. उलट अनिकेतलाच तो आला मोठा सांगणारा म्हणून टोमणे मारत होता. त्यामुळे त्या मुलात आणि अनिकेत हिप्परकर याच्यात कायम वाद विवाद आणि भांडणे होत होती. अनिकेत याचा स्वभाव तसा कडक आणि रागीट होता. त्याच्या मनाविरूध्द एखादी गोष्ट घडली की तो चिडत होता. समोरच्यावर रागवत देखील होता. मागील महिन्यापूर्वी मंडळातील मुलांचा कबड्डीचा सराव तो घेत असताना अचानक झालेल्या वादात अनिकेत याने त्या मुलाच्या कानाखाली लावली.यावरून त्यावेळी त्या मुलाबरोबर त्याच्या पालकाबरोबर अनिकेत याचा मोठा वाद झाला.त्या वादात त्यावेळी अनेकांनी मध्यस्थी करून तो वाद ही मिटवला परंतु त्या मुलाच्या डोक्यातून जे काही घडले ते काही जात नव्हते.त्याला तो त्याचा अपमान वाटत होता. अनिकेत याने आपला चार चौघात आपल्या कानाखाली लावून आपला अमपान केला असल्याचे त्याला वाटत होते. त्यामुळे तो अनिकेतवर चिडत होता. तो कुठे भेटला की त्याच्याकडे रागाने बघत तुला चांगलाच धडा शिकिवतो असे म्हणत होता. त्या मुलाच्या घरची परिस्थीती सधन होती. त्याच्या घरच्यांचा तो लाडका असल्याने तो म्हणेल ती गोष्ट त्याचे आई वडिल करीत होते. त्यामुळे तो खरे तर बिघडलाच होता. त्याचे मित्र ही तसेच होते. अजून अल्पवयीन असले तरी ते कोणतीही गोष्ट करायला मागे पुढे पाहत नव्हते. हल्लीची तरूण पिढी ही खटक्यावर बोट आणि जागेवर पलटी अशी वागत असल्याने त्या मुलाचे ही तसेच झाले होते. अनिकेतला बघितले की तो मुलगा त्याच्याकडे पाहत चरफडत होता. त्याने आपल्या जवलच्या चार पाच मित्रांना आपल्याला माझ्या अपमानाचा बदला घ्यायचा आहे,अनिकेतची गेम करायची आहे तुम्ही तयार राहा असे सांगितले होते. अनिकेत मात्र झाली गेली गोष्ट विसरून होता. त्याच्या मनात ही काही नव्हते. मात्र इकडे हा मुलगा मात्र कधी एकदा आपला बदला घेतो असे त्याला झाले होते. सांगली शहर परिसरात फाळकुट दादांचे वर्चस्व वाढले असल्याने त्या मुलाने एका पाळकुट दादाची मदत घेण्याचे ठरविले. त्याने त्याच्याकडून दोन कोयते घेतले. तो मुलगा आणि त्याचे चार मित्र हे अनिकेतची गेम करण्याची संधी शोधु लागले. त्यातच त्या मुलीची आणि त्याच्या गल्लीत राहणाऱ्या मंगेश उर्फ अवधूत संजय आरते याची ओळख झाली. मंगेशच्या नात्यातील मुलीशी अनिकेत याचे प्रेमसंबंध होते. हे प्रेमसंबंध मंगेश याला मान्य नव्हते. त्याने बऱ्याचवेळेला अनिकेत याला भेटून तुझे प्रेमसंबंध बंद कर.माझ्या नात्यातील मुलीशी प्रेमसंबंध ठेवू नकोस अशी समज अनिकेत याला दिली होती. परंतु अनिकेत याने ते प्रेमसंबंध तसेच पुढे चालू ठेवले होते.त्यामुळे मंगेश ही त्याचेवर चिडून होता. तो ही अनिकेत याची गेम वाजविण्याच्या तयारीत होता. ही गोष्ट त्या मुलाला माहित झाल्यावर तो मुलगा आणि मंगेश आरते हे मित्र बनले. त्या दोघांनी अनिकेत याची गेम करण्याचा प्लॅन केला. मंगेश याचा जय कलाल याच्याशी मैत्री होती. तो ही अनिकेतवर चिडून होता. त्याला ही त्या दोघांनी आपल्या कटात सामील करून घेतले. त्यातच जय कलाल याच्याबरोबर अनिकेत याचे २३ ऑक्टोंबर २०२३ रोजी व्याजाच्या पैशावरून वाद ही झालेला होता. त्यामुळे हे तिघे अनिकेत याला मारण्यासाठी एकत्र आले. त्यांनी आपल्या कटात आणखीन चार जणांना सामील करून घेतले. अनिकेतला मात्र आपल्या विरोधात चार पाच जण आहेत. आणि ते आपल्याला संपविण्याचा प्रयत्न करीत आहेत याची जराशी ही कल्पना नव्हती. मंगेश याचा राज अनिकेतवर जास्तच होता. कारण अनिकेत हा आपल्या नात्यातील मुलीला प्रेमसंबंधातून नादाला लावीत आहे. त्याला धडा तर शिकवावाच लागले असे त्याचे मत होते. अनिकेत हा रोज संध्याकाळी जीमला जातो हे त्या पाच जणांनी हेरले होते. मंगळवार दि.२७ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ वाजणेच्या दरम्यान नेहमीप्रमाणे हा जीमला जाण्याच्या तयारीने घरातून बाहेर पडला. तो राहत असलेल्या जामवाडी परिसरातील मरगुबाई मंदिराच्या समोर तो आला. मंगळवार असल्याने लोकांची दर्शनासाठी गर्दी ही होती. तो मरगुबाई मंदिराच्या समोरील रस्त्यावर आला असता दोन दुचाकी गाडीवरून पाच अल्पवयीन तरूण त्याच्या समोर येवून उभे टाकले. त्यातच त्याने कानाखाली मारलेला मुलगा ही होता. त्यात मंगेश आरते आणि जय कलाल याच्या हातात कोयते होते. ते दोघे आपल्या दुचाकीवर उभा राहत आपल्या हातातील कोयता त्याला दाखवित आता तुझे काही खरे नाही म्हणत होता. त्यांना बघून अनिकेत काय ओळखायचे ते ओळखला.त्याने परिस्थीतीचा अंदाज घेत तेथून पळ काढण्याचा विचार केला. परंतु त्या अल्पवयीन मुलांनी त्याला घेरले. काही कळण्याच्या आतच जय कलाल आणि मंगेश आरते यांनी अनिकेतवर आपल्याकडील कोयत्यांनी जबर वार केले.हे वार त्यांनी इतक्या त्वेषाने केले की, दोन्ही कोयते अनिकेत याच्या डोक्यातच अडकून राहिले. त्यांनी दोन्ही कोयत्यांनी मिळून तब्बल ११ वेळा वार त्याच्या मानेवर, डोक्यावर पोटावर केले. त्या वारात अनिकेत हा रक्ताच्या थारोळ्यात जागीच मृत्युमुखी पडला. ही घटना घडत असताना आजुबाजुचे लोक भयभयीत होऊन पाहत होते.मारेकरी तरूणांच्या हातात कोयते असल्याने कुणी ही घाबरून पुढे आले नाही. अनिकेत याला रक्ताच्या थारोळ्यात लोळवून त्या पाच जणांनी तेथून दुचाकीवरून पळ काढला. घटनास्थळी अनिकेत याची बॅग, चप्पल इतरत्र पडले. कुणी तरी या घटनेची माहिती सांगली शहर पोलिसांना कळवली. जामवाडी येथील मरगुबाई मंदिरासमोर तरूणाच्या खूनाची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. शहर पोलीस निरीक्षक संजय मोरे यांनी या घटनेची माहिती घेत तपासाला सुरूवात केली. घटनास्थळी मयत अनिकेत हिप्परकर याचे नातेवाईक आणि बघ्याची एकच गर्दी झाली होती. पोलीसांनी घटनास्थळी श्वान पथक आणि ठसे तज्ञांना पाचारण करून तपास मोहिम राबविली. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत अनिकेत हिप्परकर याचा मोठया भावाकडून घेतली.त्याने दिलेल्या माहितीवरून अनिकेत याच्यावर हल्ला करून खून करून गेलेले पाच ही संशयीत आरोपी हे अल्पवयीन असून याचा परिसरातील आहेत याची माहिती त्यांना मिळाली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह सांगली सिव्हिल हॉस्पिटल येथे उतरीय तपासणीसाठी पाठवून दिला.मयत अनिकेत याच्या डोक्यात घुसलेले दोन्ही कोयते काढताना बघून बघणाऱ्याची भांबेरी आणि जीवाचा थरकाप उडाला होता. या घटनेनंतर पाच ही संशयीत तरूण घटनास्थळावरून पळून कर्नाळ रोडच्या दिशेन पळून गेल्याची माहिती पोलीसांना मिळाली. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होते. गुन्हे अन्वेषणचे पो.निरी.सतीश शिंदे स.पो.नी संदीप शिंदे यांनी पोलीसांची दोन पथके तयार करून संशयीताचा माग काढला. संशयीत पाच ही आरोपी हे कर्नाळ रोड परिसरातील एका पत्र्यच्या शेडमध्ये लपले होते. तेथे सापळा रचून पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन सांगली शहर पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता, सुरूवातीला ते पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होते. ज्या मरगुबाई मंदिराच्या परिसरात ही घटना घडली तेथील आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलीसांनी चेक केले असता त्या फुटेजमध्ये ही ते पाच अल्पवयीन तरूण दिसत होते. पोलीसांनी त्यांना आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्यानंतर पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत अनिकेत हिप्परकर याच्या भावाकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी अनिकेत तुकाराम हिप्परकर (वय २२) याच्या खून प्रकरणी चार अल्पवयीन तरूण आणि मंगेश आरते आणि जय कलाल याच्या विरोधात वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे दाखल केले. त्या पाच ही जणांना पोलीसांनी मा.न्यायालयात उभे केले असता मा. न्यायालयाने त्याची रवानगी बालसुधारगृहात केली.या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेले कोयते आणि दोन दुचाकी गाडया जप्त केल्या. या घटनेचा तपास पो.निरी संजय मोरे याच्या मार्गदर्शनाखाली सांगली शहर पोलीस करीत आहेत.

पान ८ वरून....

## विनाशकारी वाढवण बंदर प्रकल्पासाठी...

सर्वच भागातील मच्छीमार मच्छीमारीसाठी गेलेले नाहीत. यामुळे आजच्या आंदोलनामध्ये आपल्याला सहभाग घेता आला. हा प्रकल्प अवघे २० ते २५ जण हाताळत आहेत. भांडवलदारांच्या सोयीसाठी हे सुरु असल्याचा आरोप करीत वेळ पडल्यास आपल्या प्रेतावरून या प्रकल्पाचे जेसीबी व डंपर नेण्याची तयारी ठेवावी लागेल. सरकारला जाग आणण्यासाठी या प्रकल्पाच्या जागेवर मच्छीमार बोटी बुडवून आम्हाला नष्ट करण्याची तयारी करावी लागेल. असे प्रतिपादन आंदोलन करताना मार्गदर्शनपर भाषणात करण्यात आले. यावेळी वाळवण बंदराच्या भूमिपूजनासाठी महामार्ग बंद ठेवण्याची पहिलीच घटना असल्याचे आंदोलनकर्त्यांतर्फे सांगण्यात आले. उपस्थितांची समायोजित भाषणे झाली. आम्ही वसईकर संघटनेचे मिलिंद खानोलकर, माजी विरोधी पक्ष नेते विनायक निकम, डॉमणिका डाबरे, कोळी युवाशक्तीचे अध्यक्ष मिल्टन सौदीया, काँग्रेस जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा, आम आदमी पार्टीचे जॉन परेरा, एवरेस्ट डाबरे, निर्भय जनमंचचे पायस मच्याडो इत्यादी पदाधिकारी व आंदोलक उपस्थित होते. सदर प्रकल्पाला विरोध स्पष्ट करणारे निवेदन नायब तहसिलदार शशिकांत नाचण व निवासी नायाब तहसिलदार राजाराम देवकाते यांना यावेळी सादर करण्यात आले.

## यंदाही १०५ कृत्रिम तलावांची बांधणी...

सर्व कृत्रिम तलावांशेजारी आरती करण्याची सोय करण्यात येणार आहे. कृत्रिम तलावा शेजारी निर्माल्य कलश ठेवण्यात येणार असून, जमा होणाऱ्या निर्माल्यातून बचत गटांच्या मार्फत खत निर्मिती केली जाणार आहे. विसर्जन स्थळी प्रथमोपचारासाठी वैद्यकीय पथकाची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. याशिवाय फिरते हौद, फिरते संकलन केंद्रांची सुविधा करण्यात येणार आहे. नागरिकांना आपल्या जवळच्या कृत्रिम तलावाचे ठिकाण गुगल लोकेशनद्वारे पाहण्यासाठी महापालिकेमार्फत लिंक प्रसिद्ध केली जाणार आहे. चार फुटांच्या मोठ्या उंचीच्या मूर्तीचे विसर्जन बंद दगडखाणीत केले जाणार आहे. विसर्जनासाठी शहरातील दोन बंद दगडखाणींची आणि दोन जेट्टींची सोय करण्यात येणार आहे. गणपती आगमन आणि विसर्जनाच्या मार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम सध्या सुरु आहे. एक खिडकी योजना आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना लवकरात लवकर परवानगी मिळण्यासाठी यावर्षीही महापालिकेमार्फत ‘एक खिडकी योजना’ सुरु असून गणेशमंडळांनी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी दिलेल्या नियमावलींचे पालन करावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी केले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरे करावेतसेच त्यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रम याबाबत त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी यावर्षी महापालिकेमार्फत ‘पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा’ आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये व मानचिन्ह असे असून याचबरोबर द्वितीय पारितोषिक १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार आणि ०१ हजार रुपयांची १० प्रोत्साहन पर पारितोषिके देण्यात येतील. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे, माजी महापौर राजीव पाटील, माजी नगरसेवक हार्दिक राऊत, बविआचे नेते विलास चोरघे, भाजपा वसई विधानसभा अध्यक्ष मनोज पाटील, प्रहार संघटनेचे वसई तालुका अध्यक्ष दुष्यंत पाटील, मनसेचे नालासोपारा अध्यक्ष मनोहर कदम, मनसेचे उपजिल्हाध्यक्ष वितेंद्र पाटील, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष विकास विचारे, वसई विरारचे संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रदीप मेस्त्री तसेच इतर पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

## चिंचोलीराव येथे महिला बचत गटांचा...

अपेक्षेप्रमाणे ते काम करीत आहेत. आता येणाजया विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस व महाविकास आघाडीला जास्तीत जास्त ताकद द्यावी. महाविकास आघाडी सरकारचे काम जनतेनी कोरोना आपत्तीत अनुभवले आहे, पाहिले आहे. जनतेला अपेक्षित काम महाविकास आघाडी सरकारने केले आहे. या कामाची त्यांनी जाहिरातबाजी केली नाही. कारण ती सरकारची जबाबदारी आहे. आताचे सरकार जाहिरातबाजीचे सरकार आहे. वेगवेगळया योजना आखून इकडचा निधी तिकडे वळवला जात आहे. संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान, शालेय गणवेश, पोषण आहार, आरोग्य सुविधा यासाठी शासनाकडे निधी नाही, असे अनेक प्रश्न आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी दिवस-रात्र परिश्रम घेऊन अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांनी काम करीत आहेत.मात्र, त्यांना शासनाकडून प्रति लाभार्थी ५० रुपये देय प्रोत्साहन रक्कम अद्यापही मिळाली नाही. भाजपने महाराष्ट्रातील अनेक उद्योग प्रकल्प बाजूच्या राज्यात नेले. त्यामुळे आपल्या मुलाबाळांचा रोजगार हिरावला. या सरकारमुळे महाराष्ट्राची अधोगती होत आहे. महाराष्ट्राला पुन्हा एक नंबर करायचे असेल तर महाविकास आघाडीच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहावे लागेल. आपल्या विचाराचे सरकार नसले तरी आपल्या विचाराच्या संस्थांत लोकहिताचे निर्णय घेतले जातात. लातूर जिल्हा बँकेने महिला भगिनींसाठी झिरो बॅलन्सवर २५ ते ३० हजारांपेक्षा अधिक खाते काढून दिले. तसेच महिलांसाठी मिनिमम बॅलन्स ही अटही शिथिल करण्यात आली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात माजी मंत्री अमित देशमुख पालकमंत्री असताना शेतकजयांना नुकसानीचे १२१ कोटींचे पॅकेज मिळाले. येणाजया काळात आपल्या विचाराचे सरकार आणायचे आहे, यासाठी सर्वांनी पाठबळ द्यावे, असे आवाहनही आमदार धिरज देशमुख यांनी केले. यावेळी रीड लातूरच्या संस्थापिका सौ.दीपशिखा धिरज देशमुख यांनीही महिलांशी संवाद साधला.यावेळी पारुबाई जाधव, इंदुबाई चंद्रकातले, गौळणबाई घोडके, यारुबाई जाधव, खातूनबी तांबोळी, छबीता घोडके, सुनिताबाई केसवे, सुननबाई बंडगर, अनुसया बनसुडे, जयश्री गवळी, रेखाबाई घोडके, मिजास तांबोळी, सुनिता सुलगुले यासह महिला उपस्थित होत्या. त्याचबरोबर गोपाळ दरेकर, बाबूराव अंबुवाने, बाबू शिवगुले, शिवाजी दरेकर, तेजु जाधव, बाबासाहेब पांडरे, समिउला पटेल, बाबूराव मेळे, कल्याणराव दरेकर, विठ्ठल केसवे, विनोद गवळी, सालार गुडवाले, देवकुमार पांडरे, वजिर पटेल आदी उपस्थित होते.

## शिवडीत शिवसेनेच्या माधवी पाटील...

जाणून आहेत म्हणूनच यांनी सदर पद यात्रे दरम्यान चांगल्या मार्कानी उत्तीर्ण झालेल्या दहावी व बारावीच्या विद्यार्थ्याचा गुणरत्न पुरस्कार देऊन गौरव करत आहेत. त्याचप्रमाणे सदर पावसाळा जेष्ठ व्यक्तींना सुसह्य व्हावा या त्या छत्री वाटप सुद्धा करत आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी शिवडी विभागातील महिलांसाठी शिव गृह उद्योग प्रशिक्षण सुरु केले आहे. सदर प्रशिक्षणा अंतर्गत महिलांसाठी विविध कोर्स संपूर्णपणे मोफत सुरु केले आहेत. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे या सगळ्या उपक्रमासाठी लागणार खर्च त्या सामाजिक जाणिवेतून स्वतःच्या वेतनातून करत आहेत. सौ. माधवीताई पाटील यांनी असे विविध उपक्रम स्वबळावर सुरु करून हे दाखवून दिले आहे की जर शिवसेना पाठीशी असेल एक महिला ही सामाजिक क्रांती करू शकते.

## पतसंस्थेच्या वर्धापन दिनी शवपेटीचे ...

गरज आहे असं संचालकांसोबत बोललो होतो त्याची आज पूर्तता पत संस्थेने केली असून लोकार्पण सोहळा होत आहे अशा चांगल्या उपक्रमाबाबात त्यांनी समाधान व्यक्त करून पतसंस्थेला शुभेच्छा दिल्या. या आधी पतसंस्थेने समाजिक बांधीलकीतुन रुग्णवाहिका, वैंकुंठ रथ, वैद्यकिय साहित्य लोकसेवा हेतूने दिले आहे. तसेच दरवर्षी वृक्षारोपण व शालेयउपयोगी साहित्यवाटप केले जाते. असल्याची माहिती संस्था अध्यक्ष मिलन पातकर यांनी देऊन ही शवपेटी संस्थेच्या कार्यालयात असून गरजूंसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमावेळी भाजपा पालघर उपाध्यक्ष संदीप पवार, संस्थेचे अध्यक्ष मिलन पातकर, उपाध्यक्ष मिलिंद वाडेकर, सचिव संदीप पातकर माजी अध्यक्ष संतोष पातकर, भानुदास भानुशाली व सर्व संचालक, संस्थेचे कर्मचारी व मान्यवर सभासद उपस्थित होते.

## राजमाता जिजामाता विद्यालयात...

शिखर सर करा, असे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. यावेळी संस्थेच्यावतीने डॉ. अनिकेत रत्नपारखी, डॉ. पुर्वेश फाले, डॉ. जहीर नेक, डॉ. अनुजा जोशी, डॉ. श्रेया दाताळ, डॉ. जसप्रित कपूर, डॉ. कृष्णा गुरमे, डॉ. प्रतिक वेदपाठक, डॉ. सचिन राख, डॉ. विपूल वळसे, अभिजीत कराड यांचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन सुनीता जवळे यांनी केले तर आभार समन्वयक राजीव मुंढे यांनी मानले.

## मुंबई विद्यापीठाची ई-समर्थ प्रशिक्षण...

मुंबई विद्यापीठाच्या प्रवेश विभागाच्या वरिष्ठ लिपिक श्रीमती अंजली दोडके, ॲफिलेशन विभागाचे वरिष्ठ लिपिक कृष्णकांत परदेशी, इलिजिबिलिटी विभागाचे वरिष्ठ लिपिक सुशांत घाडी, विनोद तेटगुरे उपस्थित होते. आभार आणि सूत्रसंचालन प्रा. विवेक कुडू यांनी केले. पर्यवेक्षक डॉ. हर्षद वनमाळी आणि डॉ.मनिष देशमुख यांनी कार्यशाळा यशस्वी करण्याकरिता मेहनत घेतली.

02 TO 08 SEPTEMBER 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 8/31/2024 8:35 PM Page 1



# दरोडा घालून लुटपाट करणाऱ्या सराईत आंतरराज्यीय टोळीला अटक

## ॲटोमॅटिक पिस्टल, धारदार शस्त्रांसह मुद्देमाल हस्तगत



**वसई/प्रतिनिधी**

दरोडा घालून जबरी चोरी करणाऱ्या ५ आरोपींच्या सराईत आंतरराज्यीय टोळीला माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपींकडून ४ गुन्ह्यांची उकल करून ॲटोमॅटिक पिस्टल, धारदार शस्त्रांसह इतर मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. वसईच्या दिवाण टॉवरमधील डीके एन्टरप्राईजेस कार्यालयात १९ ऑगस्टला दुपारी सिद्धराज राजपूत (२२) हे काम करत असताना पाच आरोपी आले. त्यातील एका आरोपीने डोक्याला पिस्तुल लावून ओरडला तर ठोकून टाकेल ड्राव्हरमध्ये असलेले पैसे काढ असे बोलून दुसऱ्याने चॉपर काढून त्याच्या मानेला लावला. सिद्धराज याचे हातपाय बांधून जीवे ठार मारण्याची धमकी देत २ मोबाईल, रोख रक्कम, डिव्हीआर असा एकूण ७३ हजार ७०० रुपयांच्या मुद्देमालाची चोरी करून पळून गेले. माणिकपूर पोलिसांनी दरोडा, आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयातील आरोपींच्या शोधासाठी वरिष्ठांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी भेट देऊन १०० पेक्षा जास्त सीसीटीव्ही तपासून व तांत्रिक विश्लेषण व बातमीदार यांच्या मदतीने आरोपी अजय मंडल (३७), शंकर गौडा (५०), विजय सिंग (५५), मोहम्मद जुबेर शेख (३२) आणि लालमणी यादव (३६) या ५ जणांच्या सराईत टोळीला ताब्यात घेऊन अटक केले आहे. या टोळीकडून पोलिसांनी ॲटोमॅटिक पिस्टल, ८ जिवंत काडतुसे, इको कार, चॉपर, चाकू, कटर मशीन, हँडल बार त्याचे शॉकेट, पाने, स्क्रू ड्रॉइव्हर, पक्कड, कटर, हातोडी, चाव्या, मोबाईल व इतर साहित्य असे एकूण ३ लाख १४ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपी शंकर गौडावर १० गुन्हे, विजय सिंगवर ५ गुन्हे, अजय मंडलवर ६ गुन्हे असे तिघांवर यापूर्वीच २१ गुन्हे दाखल आहेत. आता या ५ आरोपीकडून ४ गुन्ह्यांची उकल माणिकपूर पोलिसांनी केली आहे. सदरची कारवाई पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहाय्यक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे यांचे मार्गदर्शनाखाली माणिकपूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संतोष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सनील पाटील, सागर साबळे, पोलीस हवालदार शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, प्रविण कांदे, गोविंद लवटे, आनंदा गडदे, पुजा कांबळे, भालचंद्र बागुल, अमोल बर्डे आणि मोहन खंडवी यांनी केली आहे.

# वसईत कारमध्ये आढळला वयोवृद्धाचा मृतदेह





**वसई/प्रतिनिधी**

अपहरण केलेल्या ७५ वर्षीय वयोवृद्धाचा कारमध्ये दोरीच्या साहाय्याने बांधून हत्या केलेला मृतदेह मुंबई अहमदाबाद महामार्गावरील वसई फाटा येथे सापडल्याने वसईत खळबळ माजली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले आहे. विशेष म्हणजे या वयोवृद्धाचे अपहरण केल्याप्रकरणी मुलाच्या तक्रारीवरून नायगांव पोलिसांनी सोमवारी सकाळीच अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. उल्हासनगरच्या आर्केट बिल्डिंगमध्ये राहणारे व पेट्रोल पंपांचे मालक शैलेश काकराणी (४५) यांचे वयोवृद्ध वडील रामचंद्र काकराणी (७५) यांचे रविवारी सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास कामणच्या नागले येथून अपहरण झाल्याची तक्रार नायगाव पोलीस ठाण्यात दिली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रामचंद काकराणी (७५) हे त्यांची मोटार कार चालक मुकेश खूबचंदाणी (५४) याचेसह विरारच्या चंदनसार विरार येथील स्वतःच्या पेट्रोलपंपावर जाण्यासाठी निघाले. दुपारी साडे पाच वाजण्याच्या सुमारास रामचंद्र यांनी पेट्रोलपंपावरील मॅनेजर दयानंद पाण्डे याच्याकडून ४० हजार रोख रक्कम घेवून निघाले पण ते घरी पोचले नाही. घरच्यांनी त्यांचा इतरत्र शोध घेतला पण ते कोठेही मिळून आले नाही. त्यांच्या मोबाईलचे लोकेशन काढल्यावर त्यांचा व चालकाचा मोबाईल नागले गावचे हद्दीत रोडच्या बाजूला मिळून आले. त्यापैकी चालकाचे मोबाईल फोनमध्ये सिमकार्ड नव्हते. चालक मुकेश खूबचंदानी याने रामचंद काकराणी यांचे वयोवृध्दपणाचा फायदा घेवून त्यांचेकडील पैशांसाठी किंवा अन्य कोणत्या कारणासाठी अपहरण केल्याची तक्रार दिली आहे.

# मंद्रूप पोलिसांनी केला गुटख्यासह साडेसात लाखांचा ऐवज जप्त




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची अवैद्य वाहतूक करणाऱ्या वाहनावर मंद्रूप पोलिसांनी कारवाई करून १ लाख २६ हजारांचा गुटख्यासह साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मंद्रूप पोलीस ठाण्याचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांची ही पदभार घेताच पहिलीच धडाकेबाज कारवाई आहे. कर्नाटकातील विजयपूर येथून सोलापूरकडे एमएच १३ ईसी ८३९३ या वाहनातून गुटखा घेऊन येत आहे अशी गोपनीय माहिती मिळताच त्यांनी पोलीस उपनिरीक्षक राजू डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार दिनेश पवार, रोहन पवार, महानतेश मुळजे यांच्या पथकाने महामार्गावरील नांदणी टोलनाक्याजवळ गुटखा वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी केली यावेळी त्यांना एका वाहनात २१ गोण्यामध्ये तब्बल १ लाख २६ हजारांचा हिरवा पानमसाला व तंबाखू युक्त गुटखा मिळून आला पोलिसांनी ६ लाख रुपये किमतीची टाटा पंच गाडी असा एकूण ७ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुटक्याची अवैध वाहतूक करणारा वाहन चालक सोहेल कुरेशी (वय २३) व त्याचा साथीदार अखिल मोहम्मद शेख (वय २३) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना ताब्यात घेऊन कारवाई करण्यात आली आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यावेळी हवालदार विक्रम माने, सागर चव्हाण, महेश कोळी आदी उपस्थित होते.

# वाकोद येथील गौराई स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या ६ उमेदवारांची पोलीस दलासाठी निवड

**जळगाव/प्रतिनिधी**

वाकोद येथील गौराई स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या सहा जणांची पोलीस दलासाठी स्तुत्य निवड झालेली आहे. जळगाव पोलीससाठी रितेश पाटील, कल्पेश मोहने यांची, गजानन मगर यांची धाराशिव पोलीस दलात, वाकोद येथील तुषार पांढरे, अभय पांढरे यांची पुणे एसआरपीएफ तर भूषण पाटील दौंड एसआरपीएफ पोलीस दलासाठी निवड झाली आहे. निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन करण्यात आले. शिपाई, एम.पी.एस.सी. युपीएस.सी, ग्रामसेवक, कृषिसेवक, आरोग्यं सेवक इत्यादी स्पर्धात्मक परीक्षांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शक, पुस्तके व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे या गोष्टीचा लाभ या निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मिळालेला आहे. केवळ सहा महिन्यांमध्ये सुरू झालेल्या या गौराई स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे यश म्हणावे लागेल अशी प्रतिक्रिया अतुल जैन यांनी व्यक्त केली. हे केंद्र सुरू करण्यासाठी जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन व अतुल जैन यांची प्रेरणा लाभलेली आहे. कुठलीही व्यक्ती असो ती व्यक्ती जन्माला आली की ऋणी बनते. त्यात मातृऋण, पितृऋण, गुरुऋण आणि मातृभूमीचे ऋण असते. मातृभूमीचे ऋण तर सर्वात मोठे असते त्याच ऋणाची उतराई होण्यासाठी जैन इरिगेशनचे संस्थापक श्रद्धेय भवरलालजी जैन आणि जैन परिवार वाकोद गावासाठी ग्राम विकासाचे काम वा तत्सम गोष्टी,



कल्याणाचे काम करत आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून गौराई स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका म्हणता येईल. अथक परिश्रम आणि अभ्यासाच्या जोरावर या केंद्रातील विद्यार्थ्यांनी अलीकडेच झालेल्या महाराष्ट्रातील विविध ठिकाणी पोलीस दलाच्या निवड चाचण्या व परीक्षा झाल्या. पोलीस भरती सराव परीक्षेचे, शारीरीक क्षमतेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात गौराई स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या सहा उमेदवारांनी आपल्या बौध्दीक व शारीरीक कौशल्याची चुणूक दाखविली आहे. रितेश पाटील (१५० पैकी १३९), कल्पेश मोहने (१५० पैकी १३८), गजानन मगर (१५० पैकी १३०), तुषार पांढरे (२०० पैकी १८३) आणि अभय पांढरे (२०० पैकी १९०) भूषण पाटील (२०० पैकी १८६) असे गुण प्राप्त केले आहेत. २६ जानेवारी २०२४ ला स्पर्धा परीक्षांसाठी उमेदवारांचे शिबीर घेण्यात आले त्यात प्रमुख पाहुणे म्हणून कपिल पवार साहेब आले होते. त्याच कार्यक्रमात या केंद्राचे अनौपचारिकपणे उद्घाटन झाले. या केंद्राचे प्रमुख जयदीप पाटील असून समन्वयक म्हणून पल्लवी पाटील काम पाहत आहेत. सहा महिन्यांच्या कालावधीत विविध विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन देखील ठेवण्यात आले होते. त्यात अशोक बाविस्कर (मराठी व्याकरण), देवल पाटील (सामान्य अध्ययन), अक्षय देवरे (पॉलीटिकल सायन्स), जयदीप पाटील (अंकगणित), देवलसिंग पाटील (जनरल नॉलेज) आणि दिलीप पाटील यांनी सर्वसमावेशक विषयांवर मार्गदर्शन केले. या केंद्रामध्ये भविष्यात युपीएससी, एमपीएससी बाबत पुस्तके उपलब्धते सोबतच तज्ज्ञांचे मार्गदर्शन देखील उपलब्ध करण्यात येणार आहे.

# महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात वसईतील शिवसैनिकांचे तोंडावर काळी पट्टी आणि हातात काळे झेंडे फडकवून निषेध आंदोलन




**वसई/प्रतिनिधी**

लहान चिमुरडीवर बदलापूर येथे झालेल्या अत्याचाराबदल तसेच महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबदल महाराष्ट्र राज्यातील गुन्हेगारी वाढली आहे. त्याचा जाहीर निषेध करण्यासाठी व जनतेच्या गंभीर भावना राज्य सरकारपर्यंत पोहचवण्यासाठी २४ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. परंतु बंद करण्यास उच्च न्यायालयाने बंदी घातल्यामुळे एकूण घडलेल्या घटनेला पर्याय म्हणून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना तोंडावर काळी पट्टी बांधून, हातात काळा झेंडा फडकवून निषेध आंदोलन करण्याचे आदेश दिले. त्यानुसार शिवसेनेचे वसई तालुकाप्रमुख राजाराम बाबर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. ह्या आंदोलनात जिल्हा सहसचिव विवेक पाटील व त्यांच्या मातोश्री जेष्ठ महिला शिवसैनिक वय ८० व मावशी वय ८२ या सुध्दा उपस्थित होत्या. वसई तालुका समन्वयक विजय काशिलकर, शिव विधी पालघर चे अध्यक्ष ॲड. भरत पाटील, तालुका सचिव श्याम शिरोडकर, मीरा-भाईंदर विधानसभा संपर्कप्रमुख किरण फडणीस, विधानसभा संघटक विनायक निकम, दर्शना विश्वास राव, शहरप्रमुख संजय गुरव, उपतालुका संघटक अनिता राणे महिला शहर संघटक जसिंदा फेंच, उपशहरप्रमुख शशी शर्मा, संतोष हळदणकर, सुधाकर रेडकर, धनसुख कौसंबी, राजन पाटील, प्रशांत कुडुलकर नारायण मानकर हरेश्वर मानकर महिला आघाडी उपशहर संघटक योगिता पाटील, शुभा रेडकर, विभाग संघटक भंगे शाखा संघटक शीतल सिंग, जयश्री दवे, साधना मोहिते, रिना मोरे, पार्वती मोहिते इत्यादी सहभागी होते हया आंदोलनाचे आयोजन करण्यासाठी शाखाप्रमुख दिपक गुप्ता व समीर शेख आदी ह्या आंदोलनात सहभागी झाले होते.

# भिवंडीतील शाळेत महावाचन उत्सव; मुलींनी फोडली पुस्तक हंडी




**भिवंडी/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ सध्या विविध शाळां मध्ये राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत बुधवारी भिवंडी शहरातील जनरल एज्युकेशन संस्थेच्या प. रा. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेत नुकताच महावाचान अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे माजी विद्यार्थी व वाचन मंदिर भिवंडीचे कार्यवाह किशोर नागावेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शालेय समिती अध्यक्ष सुधीर पिंपळे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ.पौर्णिमा माळी, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. अनिता सुतार, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शुभांगी पाटील यांसह शाळेतील शिक्षक विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी फक्त पुस्तकेच नव्हे तर इमारती, माणसे, गर्दी सर्वांचेच वाचन करावे, या सर्वांचे निरीक्षण व अवलोकन करता येते. धार्मिक पुस्तके व्रतवैकल्यांमधून आपले विज्ञानही समृद्ध होते, असे सांगत विद्यार्थ्यांनी वाचनालयाचे सदस्य होऊन सतत वाचन करावे असे आवाहन उद्घाटक वाचन मंदिराचे कार्यवाह किशोर नागावेकर यांनी केले, तर वाचन हा आपल्या जीवनाचा आधार असल्याचे व वाचाल तर वाचाल असे प्रतिपादन शालेय समिती अध्यक्ष सुधीर पिंपळे यांनी केले. या कार्यक्रमात पुस्तक प्रदर्शन करून विद्यार्थ्यांद्वारे पुस्तक वाचन समीक्षण करण्यात आले. तर वाचन प्रेरणा निमित्ताने महावाचन पुस्तक हंडी चे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या ग्रंथालयात मांडलेल्या पुस्तक प्रदर्शना मधील पुस्तके विद्यार्थ्यांनी स्वतः हाताळून, त्या पुस्तकांची नोंद करून घेतली व आपला आनंद व्यक्त केला. तसेच तंत्रज्ञानाची कास धरून डिजिटल वाचनाची संकल्पना विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली. शाळेच्या पटांगणात विद्यार्थ्यांचे सामूहिक वाचन घेण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपमुख्याध्यापक विकास पाटील यांनी केले, तर पर्यवेक्षक गुरुनाथ जोशी, आर.बी.होडगर, शिक्षक देवेंद्र पाटील, राहुल गागडे, सदाशिव गारळे, दत्तू गवारी, संतोष भोईर, योगेश वल्लाल, पवन शास्त्री, साईनाथ म्हस्कर, सौ.सविता कांबळे, गीता कोठे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना सानुग्रह अनुदान लागू; प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या पाठपुराव्याला यश!



**मुंबई/प्रतिनिधी**

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता कर्तव्य बजावत असताना अपघाती मृत्यू झाल्यास रु.१०.०० लाख व कायमस्वरुपी अंपगत्व आल्यास रु.५.०० लाख रकमेचे सानुग्रह अनुदान लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला यश आले असून, या संदर्भातील महाराष्ट्र शासनाचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. १ एप्रिल, २०२४ पासून हा निर्णय लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना सानुग्रह अनुदान लागू करण्यासाठी प्रति वर्ष अंदाजित रु.१.०५ कोटी इतका आवर्ती निधी मंजूर करण्यात आला आहे. यासाठी आवश्यक असणारा निधी आगामी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. आरोग्य यंत्रणा, सेवाभावी संस्था व ग्रामस्थ, समाजातील अन्य घटक यांमध्ये आरोग्यासंदर्भात जागरुकता, सुसंवाद, समन्वय, प्रोत्साहन, निर्माण करण्याच्या दृष्टीने आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महत्वपूर्ण सामाजिक दुवा म्हणून कार्यरत आहेत. राज्यातील आशा स्वयंसेविकांचा माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब नियोजन इत्यादी कारणांसाठी नियमित गृहभेटी देणे, माता व बालकांना मार्गदर्शन करणे, रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत करणे अशा प्रकारची कर्तव्ये बजावावी लागतात. आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या कामाचे स्वरूप विचारात घेवून आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांचा कर्तव्य बजावत असताना अपघाती मृत्यू आल्यास रु.१०.०० लक्ष व कायमस्वरुपी अंपगत्त्व आल्यास रु.५.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

# श्रमजीवी संघटनेमार्फत विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी ताटली नाद आंदोलन



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार नसल्याची गंभीर बाब उघड झाली आहे. शाळांमध्ये मुलांना शिकवायला शिक्षक नसल्याने मुलांना शिक्षण कसं मिळेल? असा प्रश्न उपस्थित करून श्रमजीवी बाळ संघटने मार्फत विद्यार्थ्यांचा ताटली मोर्चा काढण्यात आला. शिक्षण हक्क कायद्याने ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायद्याने अधिकार दिला आहे मात्र आता कायदाच निष्पळ ठरत आहे. आंदोलनाचे पत्र दिल्या नंतर २२ पैकी ३ केंद्राना धान्य पुरवठा आज सुरु केल्याचे सांगितले मात्र उर्वरित शाळांना तात्काळ धान्यपुरवठा न केल्यास शाळांना टाळे ठोकण्याचा इशारा या वेळी दिला. यावेळी जिल्हा महिला प्रमुख सरिता जाधव, तालुका अध्यक्ष भरत जाधव, तालुका सचिव सुरज दळवी, रेखा पऱ्हाड, मिलिंद थुळे, राजू जाधव, आदेश वाघ, अमोल सांबरे, देवेंद्र वाघ, रफिक चौधरी, विद्यार्थी व पालक व शेकडोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# २२ पशु मालकांकडून ९४ हजारांचा दंड वसूल

लातूर : लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेत पालिकेने पकडलेल्यांपैकी ५३ मोकाट जनावरे विविध गोशाळांकडे वर्ग करण्यात आली असून २२ पशु पालकांनी दंड भरून आपापली जनावरे परत नेली आहेत. शहरातील रस्त्यावर गाय, बैल, म्हैस, रेडा, गाढव, शेळी व इतर लहान-मोठी जनावरे भटकत असत. ही मोकाट जनावरे पकडण्यासाठी महापालिकेच्या वतीने अशोक स्वच्छता सेवा मंडल यांच्यामार्फत धडक मोहीम हाती घेण्यात आली होती.या अंतर्गत दिनांक २८ ऑगस्ट पर्यंत पालिकेने ९८ जनावरे पकडून सिकंदरपुर येथे कोंडवाड्यात बंदिस्त केली होती.

## जाहीर निवेदन

मी **श्रीमती स्वाती सुभाष वेढीकर** राहणार विरार जाहीर करते की, माझे पती कै. सुभाष रघुनाथ वेढीकर यांचे दिनांक २०/०९/२०२२ रोजा निधन झाले. त्यांचे नावे असलेली कार **(हुडाई वेर्ना नंबर एमएच ४८ एस ६१४७)** मी प्रथम वारस म्हणून माझे नावे करण्याची प्रक्रिया करीत आहे. याबाबत कोणाला काहीही हरकत असल्यास १५ दिवसांत संपर्क साधावा.

**सही/-**
**स्वाती सुभाष वेढीकर**

**पत्ता : निलेश सुभाष वेढीकर**
२०१, सी विंग, पोर्णिमा बिल्डींग, सिद्धेश्वर नगर,
मनवेल पाडा रोड, विरार (ईस्ट) ता.वसई, जि. पालघर

# विनाशकारी वाढवण बंदर प्रकल्पासाठी मच्छीमार उध्वस्त केला जाईल -संजय कोळी



वसई/प्रतिनिधी

पालघर जिल्ह्याच्या किनारपट्टीवरील पारंपारीक मच्छीमारांचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या विनाशकारी वाढवण बंदरा विरोधात शुक्रवारी पालघर जिल्ह्यासह विविध ठिकाणी निषेधाचा सुर उमटला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाढवण येथे सदर बंदराच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर सरकारला आपल्या भावना पोहोचवण्यासाठी विविध ठिकाणी मोर्चे, धरणे व प्रतिकात्मक आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. सिंधुदुर्ग, पालघर, डहाणू, वसई उत्तन, वर्सोवा इत्यादी ठिकाणी मच्छीमारांनी या प्रकल्पाला विरोध करत उग्र आंदोलने केली. वसईत पाचुबंदर, किल्ला बंदर येथील मच्छीमारांनी वसई तहसीलदार कार्यालयापर्यंत मोर्चाचे आयोजन केले होते. माजी नगरसेवक संजय कोळी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित सदरच्या आंदोलनात विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटना सामील झाल्या होत्या.

यावेळी आंदोलकांना मार्गदर्शनपर भाषणामध्ये कोळी यांनी आपल्या भावना व्यक्त करत सदर प्रकल्पामुळे येथील जैवविविधता नष्ट करून पारंपरिक मच्छीमारी करणाऱ्या कुटुंबांना कायमचे नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगत या प्रकल्पासाठी पर्यावरणाची कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. अतिशय संवेदनशील असलेल्या तारापूर अणुशक्ती केंद्राची परवानगीही या प्रकल्पास घेण्यात आलेली नाही. सदर प्रकल्पासाठी पाच हजार एकरात माती भराव करण्यात येणार आहे. यापुढे जाऊन १७ हजार एकरावर हे बंदर उभे केले जाणार आहे. प्रकल्पा साठी दररोज हजारो बोटी या मार्गातून ये- जा करणार आहेत. येथील पारंपरिक मच्छीमारांचा व्यवसाय हा उथळ पाण्यावरती अवलंबून असतो १२० फुटांवर सुरू असलेली ही मासेमारी या प्रकल्पामुळे कायमची संपुष्टात येणार आहे ३७ एकर जागा या प्रकल्पामुळे बाधित झाल्यानंतर मच्छिमार कायमचा उध्वस्त होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले. लवकरच विधानसभा निवडणुका जाहीर होणार आहेत या पार्श्वभूमीवर लाडकी बहीण सारख्या योजना आणल्या जात आहेत. या प्रकल्पाला विरोध केल्यामुळे आपण सरकारचे लाडके राहिलेलो नाहीत., त्यामुळे येत्या निवडणुकीमध्ये या सरकारला धडा शिकवण्याचं काम मच्छीमारांनी करावे या प्रकल्पाच्या भूमिपूजनासाठी जाणीवपूर्वक दिवस तारीख अंधारात ठेवण्यात आली या कालावधीमध्ये मच्छीमार समुद्रात जात असतात. ही वेळ हेरून सदरचे भूमिपूजन घाई गडबडीने उरकण्याचा घाट घालण्यात आला. परंतु सरकारच्या दुर्दैवाने समुद्रात आलेल्या वादळामुळे ...पान ६ वर

# तरुणीची छेड काढल्याच्या निषेधार्थ लातुरातील महात्मा फुले भाजी मार्केट बंद



लातूर/प्रतिनिधी

भाजी खरेदी करण्यासाठी गेलेल्या तरुणीचा एका भाजी विक्रेत्याने तिची छेड काढून विनयभंग केल्याची संतापजनक घटना लातूर शहरातील महात्मा फुले भाजी मार्केटमध्ये गुरुवारी २९ ऑगस्ट रोजी घडली होती. आजम काझी या भाजी विक्रेत्या आरोपीस गांधी चौक पोलिसांनी अटकही केली आहे. मात्र त्याच्या दुकानाचा परवाना रद्द करावा आणि सदर तरुणास कडक शिक्षा द्यावी ही मागणी करत या घटनेच्या निषेधार्थ भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे, वीर यौद्धा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत रांजणकर, माजी नगरसेवक रवी सूडे, ॲड. गणेश गोमचाळे, ॲड. दिग्विजय काथवटे, श्री मजोज सूर्यवंशी मनोज डोंगरेसह हिंदुत्ववादी संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेवून आज ३० ऑगस्ट रोजी लातूर शहरातील गुळ मार्केटजवळील महात्मा फुले भाजी मार्केट बंद केले. आज महात्मा फुले भाजी मार्केटमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला, सर्व भाजी विक्रेत्यांनी या बंदला पाठींबा देत आपापली दुकाने बंद ठेवली होती. यापुढे मुलींच्या छेडछाडीचे प्रकार कदापी खपवून घेतले जाणार नाहीत असा इशारा भाजप शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळेसह हिंदुत्ववादी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# वसईत साकारली ७वी राज्यस्तरीय शिवकालीन मर्दानी आखाडा स्पर्धा



वसई/प्रतिनिधी

वसईचा राजा गणेशोत्सव मंडळ व राजा शिवछत्रपती मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र राज्य तर्फे रविवार दिनांक २५ ऑगस्ट २०२४ रोजी अण्णासाहेब वर्तक सभागृह काँग्रेस भवन पारनाका येथे सातवी राज्यस्तरीय मार्शल आर्ट शिवकालीन मर्दानी खेळ २०२४ चॅम्पियनशिपचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले होते. यावर्षीची स्पर्धा पालघर जिल्ह्याला बहुमान मिळाला होता एकूण १५० स्पर्धकांनी राज्यातून सहभाग घेऊन विविध जिल्ह्यातील प्रतिनिधी परीक्षक खेळाडूंची उपस्थित होते लाठी-काठी, तलवारबाजी, कुऱ्हाडबाजी, भाला अशा विविध स्पर्धेचं आयोजन करण्यात आले. विजेते स्पर्धकांना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. वसईचा राजा गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आलेल्या स्पर्धकांना राहण्याची व भोजनाची सोय करण्यात आली होती. आमची वसई रुग्णमित्र राजेंद्र ढगे यांच्या माध्यमातून न्यू जे पी हॉस्पिटल, वसई यांच्या वतीने प्रथमोपचार सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विजय पाटील, पंकज देशमुख, ओनील अल्मेडा, राजाराम बाबर, नितीन म्हात्रे राजा शिवछत्रपती संस्थेचे अध्यक्ष चव्हाण, योगेश पाटील, किरण शिंदे, किरण वाळंजे, राजश्री बाबर, जया नेमाने हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये मंडळाचे अध्यक्ष निलेश भानुशे, योगेश भानुशे, धीरज वर्तक, राहुल पाटील, राहुल भंडारकर, राहुल डहाणूकर, कौस्तुभ राऊत, दुर्वेश देसाई, मयंक ठाकर सर्व कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग होता. राजा शिवछत्रपती मर्दानी खेळ आखाडा पालघर जिल्ह्याचे सागर लोखंडे यांच्या देखरेखीखाली स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न झाली.



वसई येथे पार पडलेल्या १४ वर्षा खालील 'लाठी काठी' स्पर्धेत पालवी जयेश राऊत हिस गोल्ड मेडल आणि पलाश जयेश राऊत यास सिल्व्हर मेडल मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी वसई-विरार महापालिका सज्ज

# यंदाही १०५ कृत्रिम तलावांची बांधणी करणार!



विरार/प्रतिनिधी

वसई विरार शहर महानगरपालिकेने यंदाही पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला असून त्या अनुषंगाने विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी महापालिका मुख्यालयात दि.२८ ऑगस्ट २०२४ रोजी सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यंदाही महापालिकेमार्फत कृत्रिम तलावांची निर्मिती, बंद दगडखाणी मध्ये विसर्जन, फिरते हौद, निर्माल्यांपासून खत निर्मिती केली जाणार आहे. तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वसई विरार शहर महानगरपालिकेचा पर्यावरणपूरक गणेशोत्सव संपूर्ण मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये अव्वल ठरला होता, त्यामुळे यंदा अधिक व्यापक प्रमाणात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. त्या अनुषंगाने तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत महापालिका उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी मागील वर्षी आयोजित केलेल्या यशस्वीपणे झालेल्या गणेशोत्सवाच्या आयोजनाची माहिती सादर केली. यंदा महापालिकेकडून करण्यात येत असलेली तयारी, नियोजन आदीं विषयी माहिती दिली. वसई विरार शहर महापालिकेतर्फे मागील वर्षीप्रमाणे 'ईको गणेशा २०२४' ही संकल्पना राबविण्यात येत असून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना रुजावी आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जनजागृती व्हावी यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे, असे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले.

**गणेशमूर्तींची विसर्जन व्यवस्था**

मागील वर्षी एकूण ३४ हजार ४७७ गणेशमूर्तींच्या विसर्जनापैकी २० हजार ८९६ गणेशमूर्तींचे विसर्जन महानगरपालिकेच्या कृत्रिम तलाव आणि फिरत्या हौदांमध्ये झाले. यंदाही एकूण १०५ कृत्रिम तलाव बनवण्यात येणार असून, आवश्यकता असल्यास पाहणी करून अधिक कृत्रिम तलावांची बांधणी करण्यात येईल. ...पान ६ वर

# पतसंस्थेच्या वर्धापन दिनी शवपेटीचे लोकार्पण जिल्ह्यातील विश्वसनीय पतसंस्था -खा.डॉ.हेमंत सवरा



वाडा/प्रतिनिधी

जिल्ह्यातील नामांकित व विश्वासनीय पतसंस्था असा गौरव करत खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी संचालक मंडळ अणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. सतत ३० वर्षे प्रामाणिकपणे काम करून संस्था नावारूपाला आणली असे मत खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी व्यक्त केले ते वाडा येथील वाडा नागरी सहकारी पतसंस्थेचा ३० वा वर्धापन दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. वाडा तालुक्यातील सर्वात जुन्या व पालघर जिल्हातील सातत्याने 'अ' गुणांकन मिळवलेल्या आणि वाड्यातील व्यापारी व नागरिकांची विश्वासपात्र वाडा नागरी सहकारी पतसंस्थेचा ३० वा वर्धापन दिन सोहळा बुधवारी (दि.२८ ऑगस्ट) संस्थेच्या मुख्यालयात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार डॉ. हेमंत सवरा यांच्या हस्ते झाले. वाड्या सारख्या ग्रामीण अत्यावश्यक सेवा म्हणून शवपेटीची आवश्यकता होती. या शवपेटीचे लोकार्पणही सवरा यन्च्य हस्ते करण्यात आले. भाजपाचे उपजिल्हा अध्यक्ष संदीप पवार यांनी आपले मनोगत मांडताना काही दिवसांपूर्वी मी शवपेटीची वाड्यासारख्या भागाला ...पान ६ वर

# राजमाता जिजामाता विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद




लातूर/प्रतिनिधी

'मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा टप्पा -२' अंतर्गत येथील राजमाता जिजामाता विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात ५१० विद्यार्थ्यांची तज्ज्ञ डॉक्टरांच्यावतीने आरोग्य तपासणी करून मोफत औषधी देण्यात आली. यावेळी उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे तर अध्यक्षस्थानी उपप्राचार्या कविता केंद्रे उपस्थित होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, मदन धुमाळ उपस्थित होते. यावेळी यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांची त्वचारोग, बालरोग, स्त्रीरोग, सामान्य तपासणी करून निदान करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मोफत औषधी देण्यात आली. यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले, आजच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम करा, सकस व पौष्टिक आहार घ्या. सुदृढ आरोग्य ठेवून जिद्द व चिकाटी बाळगून यशाचे ...पान ६ वर

# मुंबई विद्यापीठाची ई-समर्थ प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न




वसई/प्रतिनिधी

मुंबई विद्यापीठ आणि सोनोपंत दांडेकर महाविद्यालय यांच्या वतीने पालघर जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी ई-समर्थच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या प्रवेशपूर्व नोंदणीकरीता व परीक्षेच्या कामाकरिता वापरल्या जाणाऱ्या आज्ञावली सबंधित कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर प्रशिक्षणास डॉ. प्रविण शिनकर, Department of Institution Communication Technology (DICT)चे संचालक यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेस जिल्ह्यातील पालघर, वसई, विरार, वाडा, जव्हार, खोडाळा, मोखाडा, तलासरी, डहाणू, दादरा परिसरातील ४२ महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्रबंधक, वरिष्ठ आणि कनिष्ठ लिपिक तसेच प्रवेश प्रक्रिया व परीक्षा विभागात काम करणारे इतर सहकारी असे एकूण ११२ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यशाळेस उपस्थित मान्यवरांचे स्वागत सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तानाजी पोळ यांनी केले. मुंबई विद्यापीठाच्या ई-समर्थ पोर्टल बाबतीतील शंकांचे निरसन व मार्गदर्शन सीसीएफच्या सिनियर डेव्हलपर निकिता ठाकरे, भारती सिंग आणि प्रिन्स यादव यांनी प्रात्यक्षिकासह केले. प्रवेश, निकाल, पात्रता, संलग्नता या संदर्भातल्या माहितीचे पीपीटीच्या माध्यमातून सादरीकरण केले. अनेक प्रशिक्षणार्थ्यांनी आपल्या सूचना कार्यशाळेत मांडल्या. चर्चा करून काही सूचना स्वीकारण्यात आल्या. सदर प्रशिक्षण कार्यशाळेस ...पान ६ वर

# त्वरीत मदतीसाठी 'येता संकट बालकावरी १०९८ मदत करी'

लातूर/प्रतिनिधी

आपल्या आजूबाजूला आपल्याला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैगिंक अत्याचार ग्रस्त बालके, हरवलेली बालके तसेच सापडलेली बालके, मदतीची आवश्यकता असलेली संकटग्रस्त बालके आढळल्यास अश्या बालकांना त्वरित आवश्यक मदत कोठून व कशी मिळवून देता येईल, या करीता कोठे संपर्क करावा या बाबत सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असतो. अश्या संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीकरिता भारत सरकार, महिला व बाल विकास विभाग नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग यांच्या मार्फत ० ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्प लाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. सदर सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४/७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध आहे. सदर सेवेचा लाभ बालक स्वत:घेवू शकतो किंवा इतर कोणतीही सदर सेवेव्दारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात. या निवेदनाव्दारे १०९८ या टोल फ्रि क्रमांकावर कॉल करुन संकटग्रस्त बालकांना मत करावी असे अवाहन आयुक्त महिला व बाल विकास डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

# चिंचोलीराव येथे महिला बचत गटांचा मेळावा संपन्न



लातूर/प्रतिनिधी

चार दशकापूर्वी चिंचोलीरावच्या माळरानावर मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याची उभारणी झाली. लोकनेते विलासराव देशमुख, स्व.बब्रुवान काळे, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी त्यांच्या सहकाजयांनी लावलेल्या या रोपटयामुळे शेतकजयांची आर्थिक परिस्थिती झपाट्याने बदलली. शेतकजयांना शाश्र्वत आधार देणे, रोजगार निर्माण करणे यामुळे आपले शेतकजयांचे जीवनमान उंचावले.हा शाश्वत विकास कायम राहावा, यासाठी शेतकजयांनी नेहमीच आम्हाला खंबीर साथ दिली.ती साथ पुढेही कायम राहील, असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले, लातूर तालुक्यातील चिंचोलिराव येथील खंडेराव सप्राळ यांच्या निवासस्थानी दि.३० ऑगस्ट रोजी महिला बचत गटांचा मेळावा घेण्यात आला. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना आमदार धिरज देशमुख बोलत होते.या वेळी प्रमुख पाहूण्या म्हणून विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई देशमुख, रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धीरज देशमुख, सुनिता अरळीकर, अमर पांडे, डॉ. हनुमंत किणीकर, डॉ. कल्पना किणीकर, पांडुरंग पाटील, खंडेराव सप्राळ, सादीक पटेल, साहेबराव पांढरे, वैशाली दरेकर, फातेमा गुडवाले, सुमनबाई बंडगर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार धिरज देशमुख म्हणाले, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर परिवाराच्या चांगल्या कामगिरीमुळे शेतकजयांमध्ये आर्थिक स्थैर्य निर्माण झाले. मांजरा परिवाराच्या माध्यमातून प्रतिवर्ष हजार ते बाराशे कोटी रुपये शेतकजयांच्या खात्यावर वर्ग केले जातात. काँग्रेस व महाविकास आघाडीला मराठवाडयात चांगले दिवस येत आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. काँग्रेसचे सर्व उमेदवार विजयी झाले. लातूरमध्ये १० वर्षानंतर काँग्रेसचा खासदार निवडून आणला. आपल्या ...पान ६ वर

# शिवडीत शिवसेनेच्या माधवी पाटील यांच्या संवाद यात्रेला प्रचंड प्रतिसाद!



मुंबई/प्रतिनिधी

शिवडी विधानसभा क्षेत्रातील महिला सहसंघटक सौ. माधवीताई पाटील यांनी माझा विभाग माझी माणसं या घोषवाक्या नुसार संवाद यात्रा सुरु केली आहे. मे महिन्याचा कडक उन्हाळा असो व आता सुरु असलेला तुफानी पाऊस, माधवीताई अश्या परिक्षा घेणार्यो परिस्थीतीत सुद्धा घराघरात जाऊन प्रत्येक नागरीकाला स्वतः भेटत आहेत. सदर पद यात्रेत सौ. माधवीताई पाटील या शिवडी विभागातील घराघरात भेट देत असलयाने त्यांना नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या वरिष्ठां पर्यंत पोहचवून यावर तोडगा काढने सोपे जात आहे. जणू आपली बहीणच भेटण्यास आली आहे या भावनेनेच प्रत्येक घरात माधवीताईंचे स्वागत होत आहे. सौ. माधवीताई पाटील या स्वतः ऊच्चशिक्षित असल्याने त्या शिक्षणाचे महत्व ...पान ६ वर